साप्ताहिक

# माणूस

शनिवार
२१ नोव्हेंबर १९८१

किंमत
एक रुपया

# शरद जोशी यांची स्थिती संभाजीसारखी होत आहे !

प्रगत औद्योगिक देशांचे, म्हणजे मुख्यत: अमेरिका व प. युरोपचे आर्थिक वर्चस्व झुगारून, तिसरे जग, म्हणजे भारत व आशिया-आफ्रिकेतील इतर देश स्वावलंबी बनवणे, हे कार्य इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात करू पाहत आहेत.

पण अमेरिकेची व तंत्रवैज्ञानिकदृष्ट्या खूप आघाडीवर असलेल्या राष्ट्रांच्या उद्योगधंद्यांची जशीच्या तशी प्रतिकृती येथे तयार करून हे कार्य कसे काय साध्य होऊ शकणार, याचा विचार मात्र इंदिरा गांधी पुरेशा गंभीरपणे करताना दिसत नाहीत. तसे असते तर त्यांच्या पक्षाने शेतकऱ्यांची चळवळ झोडपून, दडपून काढण्याचा जो पवित्रा अलीकडे घेतला आहे तो घेतला नसता. त्यांची देशांतर्गत धोरणे आणि त्यांचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील कार्य यांची दिशा परस्परविरोधी आहे, विसंगत आहे. गेल्या वर्षी त्यांनी दिल्लीला शेतकऱ्यांचा प्रचंड मेळावा भरवला. लाखो किसानांना त्यांनी दिल्ली जवळजवळ फुकट दाखवली. यंदा त्या किसानांना, कामगारांनाही झोडपीत सुटल्या आहेत! येथील कामगारांना, मुख्यत: किसानांना झोडपून, दडपून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्या अमेरिका–रशियाची व इतर प्रगत औद्योगिक देशांची आर्थिक गुलामगिरी कशी काय झुगारून देऊ शकणार आहेत? ते अशक्य आहे. चँक-कै-शेकला चीनमध्ये जो अनुभव आला तोच दुर्दैवाने त्यांना येथेही घ्यावा लागेल–जर त्यांनी देशांतर्गत धोरणे आणि आंतरराष्ट्रीय धोरणे यांच्यातील विसंगती, परस्पर विरोध लवकर दूर केला नाही तर? शेतीचे उत्पादन, खनिजे, इतर कच्चा माल यांना जोवर किफायतशीर भाव मिळत नाहीत तोवर औद्योगिकदृष्ट्या पुढारलेली, तंत्रविज्ञानात खूप आघाडीवर असलेली पाश्चिमात्य राष्ट्रे तिसऱ्या जगतावर, भारतावर आपले वर्चस्व गाजवत राहणार, हे आपण कधीही विसरता कामा नये. आपण औद्योगिक प्रगती कितीही केली तरी ती पाश्चिमात्य देशांची, अमेरिकेची किंवा रशियाची नक्कलच ठरणार आहे आणि नक्कल जोवर चालू आहे तोवर या नाही त्या स्वरूपात परावलंबित्व, अनुकरण, म्हणजेच गुलामगिरीही अटळच आहे. विकासाचा काही स्वतंत्र मार्ग, नवा पर्याय शोधून काढण्यासाठी जी राष्ट्रे थोडीफार धडपडली ती भारतापेक्षा, आर्थिक क्षेत्रात अधिक स्वावलंबी झाली. आपल्याला मात्र स्वतंत्र होऊन चौतीस वर्षे उलटली तरी पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज, जागतिक नाणेनिधीकडून उचलण्याची वेळ आली! घोषणा स्वावलंबनाची, बड्या राष्ट्रांची आर्थिक गुलामगिरी झुगारून देण्याची; वाटचाल मात्र परावलंबन वाढवणारी, स्वातंत्र्याचा संकोच करणारी. शेतीक्षेत्रात, ग्रामीण विभागात आपण अधिक गुंतवणूक केली असती तर ही वेळ आपल्यावर आली नसती. गुंतवणूक करण्याचा अगदी सोपा व सर्वांना आकर्षित करू शकेल असा मार्ग म्हणजे शेतीमालाला, ग्रामीण उद्योगधंद्यांना किफायतशीर भावांची हमी देणे. यामुळे खेडेगावात, शेतीक्षेत्रात, ग्रामीण व्यवसायात माणसे अधिक प्रमाणात स्थिरावली असती, शहरांकडे त्यांचे लोंढे वाहिले नसते, शहरे आणि खेडी यांच्यातील दरी कमी झाली असती, निदान गेल्या तीस वर्षांत वाढली ती वाढली तरी नसती व आपले परदेशांवरचे अवलंबन कमी झाले असते. कारण ग्रामीण भागाचा, शेतीक्षेत्राचा कायापालट करू शकणारे आधुनिक ज्ञान-विज्ञान भारतात आजही उपलब्ध आहे. त्यासाठी परदेशांची मदत घेण्याचे काहीच कारण नाही.

अशी वस्तुस्थिती आहे की, जे नाते प्रगत औद्योगिक देश व तिसऱ्या जगतातील आपल्यासारखे शेतीप्रधान देश यांच्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर आहे तेच नाते, देशातल्या देशात, आपली शहरे व आपली खेडी यांच्यात आज अस्तित्वात आहे. अमेरिका–युरोप यांचे वर्चस्व झुगारायाचे तर अंतिमत: मुंबई–कलकत्ता शहरांचे आसपासच्या ग्रामीण विभागांवर असलेले वर्चस्वही झुगारून देण्याची आपली तयारी हवी. कारण मुंबई–कलकत्ता म्हणजे लंडन–न्यूयॉर्कची नक्कलच म्हटली पाहिजे. न्यूयॉर्क नको असेल तर मुंबई आहे तशी ठेवून कशी चालेल ?

म्हणून ज्यांना आर्थिक स्वावलंबन हवे आहे त्यांनी तरी निदान, ग्रामीण भाग वर उचलू पाहणाऱ्या, शहरांऐवजी खेड्यापाड्यांच्या विकासाला प्राधान्य देणाऱ्या

सर्व चळवळीना, सर्व प्रवृत्तीना, विचारांना केवळ पाठिंबाच न देता त्यांचा हिरीरीने पुरस्कारही करायला हवा आहे.

याऐवजी इंदिरा गांधी व त्यांचे अंतुल्यासारखे सरदार-सुभेदार शेतकऱ्यांना, त्यांच्या नेत्याना झोडपून काढत आहेत, गोळ्या चालवून ठार मारत आहेत, तुरुंगात डांबत आहेत, गावोगाव त्यांच्या, या न्यायालयातून त्या न्यायालयात धिंडी काढत आहेत. हा देश शेतकऱ्यांचा म्हणायचे. किफायतशीर शेतमालभावांची शेतकऱ्याची मागणी न्याय्य आहे असे एकमुखाने सर्वांनी कबूल करायचे. या मागणीकडे व तदनुषंगित शेतकऱ्याच्या इतर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी वर्षातून एक दिवस, फक्त बारा तास, शेतकऱ्यानी काही जिल्ह्यातले, काही रस्ते अडवले, वाहतूक थोडी अडवली की, पिसाळल्यासारखे त्यांच्यावर तुटून पडायचे, मारझोड-गोळीबार करून त्यांच्यावर दहशत बसवायची, ही कुठली तऱ्हा ? बड्या व इंदिरा गांधीच्या कृपेवर जगणाऱ्या वृत्तपत्रांनी तर शरद जोशी याना शत्रू क्रमांक एक मानलेले दिसते राजकीय पक्षाचे व शरद जोशीचे सख्य प्रसिद्धच आहे ! शेतकऱ्यांसाठी लढणारा हा अभिमन्यू व त्याचे मुठभर सहकारी यामुळे आज एकाकी पडल्यासारखे दिसतात. वृत्तपत्रे, इंदिराशासन व सर्व राजकीय पक्ष एका बाजूस व शरद जोशी व त्यांची शेतकरी संघटना दुसऱ्या बाजूस, असा सरळसरळ विरोधी सामना आता खडा झाल्यासारखा दिसतो आहे. सर्व बळानिशी हे आंदोलन दडपून-चिरडून टाकण्याचा शासनाने चंगच बांधला आहे. तेव्हा शरद जोशी व त्यांची शेतकरी संघटना यांना यापुढे फार मोठ्या दिव्यातून जावे लागणार आहे, यापुढचा काळ कठीण आहे, कसोटीचा आहे, हे त्यांनीही ओळखायला हवे. शिवपुत्र सभाजीसारखी त्यांची आज स्थिती झालेली आहे. शत्रूनी चारी बाजूंनी उठाव केलेला आहे. फंदफितुरी माजली आहे. दिल्लीपती त्यांच्या लहानशा प्रारभावस्थेतल्या ग्रामस्वराज्याचा घास घेण्यासाठी टपून बसलेले आहेत. अशा वेळी त्यांना 'शिवरायाचे आठवावे स्वरूप ' असे सांगणारा कुणी रामदासही अस्तित्वात नाही. पण त्यांच्या चळवळीला, त्यांच्या मागण्यांना मन पूर्वक पाठिंबा देणाऱ्या, पण त्यांच्या मार्गाविषयी साशकता असणाऱ्या प्रामाणिक हितचिंतकाच्या विचारांकडे त्यांनी थोडे बहुत लक्ष पुरवले तर या कठीण काळातूनही ते चळवळ पुढे नेऊ शकतील आणि ही चळवळ पुढे जाण्या न जाण्यावरच *भारताचे आतरराष्ट्रीय क्षेत्रातील स्थान* अवलंबून राहणार आहे. औद्योगिक राष्ट्रांच्या पंजातून भारताची मुक्तता करून घ्यावयाची असेल, देश स्वावलंबी व स्वाश्रयी व्हायचा असेल तर येथल्या शेतकऱ्याचा कणा ताठ व्हायला हवा, येथला ग्रामीण परिसर बदलायला हवा. सबंध शेतकरी आंदोलनाचा हा रोख आहे, असायला हवा. हा रोख ध्यानात घेऊन शरद जोशीशी, शेतकरी आंदोलनाशी वास्तविक सहकार्य करण्याची भूमिका इंदिरा गांधीनी घ्यायला हवी. त्या ऐवजी त्यानी दडपशाही सुरू केली आहे. यात त्यांची अदूरदृष्टी आहे.

**—श्री. ग. मा.**

पुणे वार्ता

# पुन्हा एकदा रस्ता रोको !

दिवाळी संपली आणि शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेने आंदोलनाचं पहिलं शिंग फुंकले. १० नोव्हेंबरला सकाळी ६ ते संध्याकाळी ६ पर्यंत ' रेल्वे – रस्ता रोको ' आंदोलन जाहीर करण्यात आले.

निपाणी-आंदोलनानंतर संघटनेने एवढ्या व्यापक प्रमाणावर प्रथमच लढा जाहीर केला होता. त्यामुळे अनेकांना या लढ्याविषयी कुतुहल होते. राज्य शासनाच्या आणि पोलिसांच्या मनात धाकधूक होती. शेतकऱ्यांचे कोणतंही आंदोलन यापुढे चिरडून टाकायचं, असं राष्ट्रीय धोरण ठरलं असल्याचं आता स्पष्ट झालं आहे या पार्श्वभूमीवरच १० नोव्हेंबरची सकाळ उगवली.

चाकण हा शरद जोशीचा पुणे जिल्ह्यातील बालेकिल्ला. त्यामुळे आम्हीही आमचा मोर्चा प्रथम तिकडेच वळवला. चाकण जवळ येऊ लागलं तसतसं १९८० च्या कांदा-आंदोलनाच्या स्मृती जाग्या होऊ लागल्या. नाकावर बसलेल्या माशीप्रमाणे साऱ्या देशाचं लक्ष या एवढ्याशा गावानं स्वत.कडे खेचून घेतलं. एक नवी संघटना, नवं नेतृत्व, नवं तत्वज्ञान, नवा अर्थवाद या ठिकाणी आकार घेत होता. ' पाहता पाहता ' त्याच्या ज्वाला भडकू लागल्या. त्याची धग महाराष्ट्रात


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : पंचविसावा

२१ नोव्हेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३० दूरध्वनी : ४४३४५९

अन्य ठिकाणीही जाणवू लागली. ऑक्टोबरात नासिक–पिंपळगाव–बसवतला ऊस-आंदोलन झाले. त्यानंतर निपाणीचं तंबाखू आंदोलन ! मराठवाड्यात कापसासाठी 'चक्का जाम !'

चाकणमध्ये शिरलो आणि या मनात गोळा होत असलेल्या नोंदी अचानक विरघळल्या. चाकणमध्ये संपूर्ण सामसूम होती. पोलीस – फौजफाटा मात्र भरपूर होता. इकडे तिकडे चौकशी केल्यावर काही माणसं जमली; पण आंदोलनाबद्दल कोणीच फारसं बोलत नव्हतं. कोणाची काही करण्याची इच्छाच नव्हती. काद्यासाठी आंदोलन करा, बघा कसे सगळे धावत येतील !' – एक तरुण सगळ्यांवर चिडून बोलत होता.

या वातावरणामागचं आणखीही एक कारण नंतर कळलं. चाकण हा शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला आहे हे माहीत असल्यामुळे पोलीसखात्याने या परिसरात जोरदार बंदोबस्त तर ठेवला होताच, शिवाय इथल्या वस्त्या – वस्त्यांवर पोलीस एसआरपीचा फौजफाटा ठेवून घरातली माणसं घरातच राहतील, याची चोख काळजी घेतली होती आणि सगळीकडेच जबरदस्त दहशत निर्माण केली होती. या व्यतिरिक्त शेतकरी संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांची आधीच धरपकड करून ठेवली होती, ते वेगळंच !

थोड्याशा निराशेनंच चाकणमधून बाहेर पडलो. भोवताली रान पेटलं असताना पहिली ठिणगी जिथं पडली ती जमीन मात्र थंडगार असावी, याचा विषाद वाटला.

पुणे–सोलापूर-रस्त्यावर आलो. हडपसर पोलीसचौकी मागे टाकली आणि आंदोलनाचं वातावरण जाणवू लागलं. मन उल्हासित झालं. रस्त्यावर एका बाजूला पुठ्ठयाचा बोर्ड लटकत होता 'किसानोसे जो टकराएगा – – ' वगैरे वगैरे. या ठिकाणी सकाळी अकरा – साडेअकरा वाजता सुमारे नव्वद निदर्शकांनी स्वतःला अटक करून घेतली. जनता पक्षाचे आमदार श्री. विठ्ठल तुपे याच्या नेतृत्वाखाली या ठिकाणी 'रस्ता रोको' आंदोलन झालं. खरं म्हणजे, जनता पक्षाने आजच्या आंदोलनाला जाहीर विरोध केला होता; पण श्री. तुपे आंदोलनात उतरले. या मागे एक तर त्यात काही राजकीय हिशेब असले पाहिजेत किंवा या भागात शेतकऱ्यांचं प्रमाण जास्त असल्याने त्यांच्यावर दबाव आला असला पाहिजे. ते काहीही असो, विठ्ठलरावानी आंदोलनाचा फार्स केला, हेही काही कमी नव्हते.

हडपसरच्या पुढे माजरी फार्मजवळ गेलो आणि रस्त्यावर डाव्या हाताला उसाच्या फडातून बाहेर येत असलेल्या बैलगाड्या दिसल्या. ज्याच्यासाठी आजच आंदोलन पुकारलं होतं ते शेतकरी आपल्या उसाला भाव मिळाल्यावर बिनबोभाटपणानं कारखान्यात मोळ्या टाकायला निघाले होते; पण पंचवीस–तीस बैलगाड्या रस्त्यावर आल्या आणि जागीच थांबल्या. पुढे रस्ता अडवला होता. गाडीवानांनी पंधरा–वीस मिनिटं वाट पाहिली आणि त्यांनी शांतपणे आपले बैल रस्त्यावर सोडले. त्यामधून वाट काढत ज्या ठिकाणी रस्ता अडवला होता तिथे जाऊन पोचलो. रस्त्यावर झाडाच्या मोठमोठ्या फांद्या टाकल्या होत्या. शिंदीची झाडं तर मुळासकट उपटून रस्त्यावर आणून टाकलेली होती. बाभळीच्या काटेरी जाळ्याही आडव्या-तिडव्या टाकलेल्या होत्या. तीस–चाळीस तरुण पोरं रस्त्याच्या दोन्ही बाजूना हसत–खिदळत उभी होती. एवढ्यात पोलिसांची जीप आली. दोन रायफलधारी आणि चार–सहा पोलीस खाली उतरले. एक–दोन साहेबही गुर्मीत फिरायला लागले. तिथं उभ्या असलेल्या पोरानाच बोलावून पोलिसानी अडथळे दूर केले आणि धुरळा उडवत जीप निघून गेली. तिच्या मागोमाग चार–सहा ट्रक आणि उसाच्या बैलगाड्याही मार्गस्थ झाल्या; पण त्या दीड–दोन फर्लांग जातात न जातात तोच पुन्हा रस्ता अडवलेला ! इथे तर रस्त्यावर दगडांची अक्षरशः रास पसरलेली होती. दरम्यान मागच्या बाजूलाही पोरांनी पुन्हा झाड–झुडपं रस्त्यावर आणून टाकली आणि दोन अडथळ्यांच्या मध्ये सर्व गाड्या अडकल्या. पोलीसफाटा फारच कमी असावा. जेमतेम दोन जिपा आणि दहा–पंधरा पोलीस. त्यामुळे संबंध रस्त्यावर कुठेच वाहतूक सुरळीतपणे होत नव्हती. कुठे ना कुठे तरी 'रस्ता रोको' चालूच होतं. आमचा एक मित्र म्हणाला, 'सत्ताधारी पक्ष अन्य राजकीय विरोधकाशी यशस्वीपणे लढू शकतो; पण सामान्य जनताच आंदोलनात उतरली तर मात्र ते हतबल ठरतात !'

पोलीस आणि आंदोलकांची ही शिवाशिवी पाहून मागे फिरलो. स्वारगेट पोलीस चौकीवर जाऊन पुणे–सातारा रस्त्यावरच्या परिस्थितीची चौकशी केली तर हवेली स्टेशनच्या पोलिसांची कुमक नुकतीच खेड–शिवापूरच्या दिशेनं रवाना झाल्याचं समजलं. आमचीही त्या दिशेनं दौड सुरू झाली.

कात्रजघाटात शिरलो. घाट पूर्णपणे रिकामा दिसत होता. म्हणजे पलीकडे कुठे तरी आंदोलकानी रस्ता रोखून धरलेला दिसत होता. माथ्यावरून बोगद्यामधून उतरणीला लागलो. शिवापूर आलं आणि समोरून वाहनं येताना दिसायला लागली. रस्ता मोकळा झालेला दिसत होता, तरी नसरापूरपर्यंत गेलोच. एका छोट्या बाकड्यावर एक पोलीस बसला होता. त्याच्या घेरदारपणामुळं बाकडंसुद्धा खुर्चीसारखं दिसत होतं. त्याला विचारलं, 'रस्ता रोको' कुठं चालू आहे ?' पण त्याने 'सर्वत्र शांत' असल्याचं सरकारी उत्तर दिलं.

मागे फिरलो. पुण्यात येईपर्यंत संध्याकाळ होऊन गेली होती. राज्यात इतरत्र झालेल्या 'रस्ता रोको' आंदोलनाच्या 'सेन्सॉर' केलेल्या बातम्या रेडिओ–टी. व्ही. वर कळल्या; पण समाधान झालं नाही. या माध्यमाची विश्वासार्हता दिवसेंदिवस ढासळतच चालली आहे. ती पूर्णपणे 'सरकारी' बनत चालली आहेत. त्यामुळे रात्री एका दैनिकाच्या कचेरीत गेलो. तिथं जास्त सविस्तर बातमी मिळाली– 'रस्ता रोको' आंदोलनास हिंसक वळण : मालेगाव, धुळे, पूरगाव आणि भातकुडगावला गोळीबार ! चार ठार ! शेकडो जखमी ! अनेक ठिकाणी वाहतूक विस्कळित, हजारो आंदोलकांची धरपकड. टेहळणीसाठी हेलिकॉप्टर !!

रात्री अंथरुणावर पडलो असताना पुराणातली एक गोष्ट आठवली. एक राजा होता. सुखाने राज्य करत होता; पण त्याला साप चावून मृत्यू येईल, अशी भविष्यवाणी झाली आणि राजा घाबरून गेला. त्याने जगातल्या यच्चयावत सापाना ठार मारून टाकायचं ठरवलं. त्यासाठी मोठा सर्प–यज्ञ केला. यज्ञात हजारो लहान–मोठ्या सापाची आहुती पडली. राजाला वाटलं, धोका टळला! राजा थोडा निर्धास्त झाला. एक दिवस

पृष्ठ २३ वर

कदाचित मुस्लिमांत जातीयता नसेलही; परंतु गेल्या काही दिवसातील वर्तमानपत्रे नि इतर साहित्य वाचून जे लक्षात आले ते साररूपाने दिले आहे.

# मुस्लिमांतील जातिभेद आणि समता !

सुहास हरी जोशी

मुसलमानांत जातिभेद नाहीत, सार्वत्रिक समता आहे, असा एक डांगोरा सध्या पिटला जात आहे. जगातला येथला–तेथला सर्व मुसलमान हा एक नि समान आहे, असा मीनाक्षीपुरम्च्या निमित्ताने उद्घोष करण्यात येत आहे नि आश्चर्याची गोष्ट म्हणजे काही लोक असल्या गोबेल्सछाप प्रचाराला फसत आहेत नि बळी पडत आहेत!

परंतु डोके अतिशय थंड ठेवून सर्वांनीच या गोष्टीचा विवेकपूर्वक विचार करावा, अशी विनंती आहे. विद्वान लोक या गोष्टीचा खूपच अभ्यास करतील नि साधक–बाधक प्रमाणे देऊन यावर एखादा प्रबंधसुद्धा लिहितील; पण ती गोष्ट दूर ठेवली नि अगदी साधा वर-वर विचार केला, प्रतिदिनच्या वर्तमानपत्रातल्या घटना समजावून घेतल्या, तरीसुद्धा काय लक्षात येईल ? मुसलमान येथून-तेथून समानत्याच्यात कसलेही भेद नाहीत हे खरे नाही. व्यर्थ विश्वास ठेवणे कठीण जाते.

१. ज्या दिवशी या वार्ता येत होत्या त्याच काळात एक मुस्लिम तरुण भेटला. बिचारा त्रस्त झाला होता. 'काय रे काय झाले, एवढी चिंता करायला ?' असे विचारले तर म्हणतो कसा, 'काय करू ? लग्न तर करायचंय; पण या खेड्यात, तालुक्यांत पठाण जातीची मुलगी मिळत नाही ! आईने तर सक्तच सांगितले आहे. 'विवाह करायचा तर तो पठाण मुलीशीच !' घ्या ! आता काय बोलणार ?

२. याच काळात शिया आणि सुन्नी यांच्यात प्रचंड दंगल उसळली. लखनौ येथे कित्येकजण ठार झाले, कित्येक जखमी, कित्येकांचे संसार उद्ध्वस्त! एकाच महम्मद-अनुयायामध्ये झालेला हा भीषण रक्तपात बघून अनेकजण थक्क झाले ! मुस्लिमांत तर जातिभेद नाहीत, भेदाभेद नाहीत आणि इथे तर परस्परांच्या जीव घ्यायला टपलेले हे रक्तपिपासू लोक, त्यांचे पिढ्यान्पिढ्या चाललेले भीषण वैर पाहिले की वाटते, गड्या, हे काही खरे नाही !

३. याच काळात भा. ज. प. चे प्रख्यात नेते श्री. सिकन्दर बख्त यांचे पुण्यात प्रकट भाषण झाले. अभ्यास वर्गातही त्यांचे विचार त्यांनी मांडले. ते म्हणाले की, मुसलमानांमध्ये जाती नाहीत हे खरे नाही. खाटिक मुस्लिम, भंगी मुस्लिम, नाभिक मुस्लिम, चर्मकार मुस्लिम यांना मुसलमान समाजात कमी दर्जाचे मानले जाते. याला परका आहेरच म्हणायचा का ?

४. मुसलमानातील प्रादेशिक भेद लक्षात घेण्यासारखे आहेतच. केरळी मुस्लिम, तेलगू मुस्लिम, मराठी मुस्लिम, राजस्थानी मुस्लिम, पंजाबी मुस्लिम इ. पण समजा, घटकाभर गृहीत धरले की, हे भेद मुसलमानात नाहीत तरीही, तुर्क, अरब, इराणी, अफगाणी, पाकी, बिहारी, बांगलादेशीय, चिनी, रशियन, सुदानी, निग्रो, इंडोनेशियन, फिलिपिनो, मलायी, आदी देशवाचक भेद तर फारच ठळक आहेत.

५. एक विचारवंत श्रीमान श्रीपाद जोशी काय म्हणतात पाहा–

इस्लाम समतेचा पुरस्कर्ता आहे; पण (केवळ) कुराणात ! प्रत्यक्ष ? अरब लोक आपल्या निग्रो बांधवांशी प्रेमाने वागतात; पण जेव्हा लग्नाचा प्रश्न येतो तेव्हा मात्र निग्रो पुरुषाशी वा स्त्रीशी विवाह करण्यास कोणी तयार होत नाही. किंबहुना, अरबांमध्येही खानदानीपणाच्या उतरंडी आहेत. आपल्याहून खालच्या दर्जाच्या अरब घराण्याशी संबंध ठेवण्यास कोणताही अरब सहसा तयार होत नाही !

एवढेच नाही, भारतात तर आणखी वाईट स्थिती आहे. इथल्या जातीय विषमतेपासून कोणताही धर्म अलिप्त राहिलेला नाही. प्रलोभन वा जुलूम यामुळ इस्लामचा स्वीकार केला तरी त्यांना धर्मान्तरानंतर आपले जुने संस्कार विसरता आले नाहीत. त्यांनी धर्म बदलला तरी आपली जात कायम ठेवलेली आहे. (ख्रिस्ती लोकातही ब्राह्मण ख्रिस्ती, मराठी ख्रिस्ती, महार ख्रिस्ती असे दिसतेच).

६. आणखी एका वार्तेकडे आपले लक्ष वेधतो. श्री संकेश्वर पीठाच्या जगद्गुरु श्रीशङ्कराचार्यांच्या मार्गदर्शनाखाली चिकोडी तालुक्यातील करदगागावच्या पूर्वाश्रमीच्या हिंदू हरिजन असलेल्या पण नतर मुसलमान झालेल्या लोकांनी परत हिंदु धर्मात प्रवेश केला आहे. ३५ वर्षांपूर्वी ते मुस्लिम झाले होते; पण गेल्या ३५ वर्षांत मुसलमान झालेल्या या हरिजन बांधवांना समतेची वागणूक कधीच मिळाली नाही. म्हणून पश्चात्ताप होऊन या हरिजन बांधवांनी इस्लामचा त्याग करून पुन्हा हिंदुधर्मात प्रवेश केला आहे.

७. महाबळेश्वरचे श्री. अनिल यादव (म. टा. १४-८-८१) म्हणतात : महाबळेश्वर, या गावी २५ टक्के मुसलमान वस्ती आहे. त्यामध्ये शेख, सय्यद, तांबोळी, पिंजारी, बागवन, मेमन, खोजा, खाटिक, कसाई नि धावड या जाती आहेत. धावड ही जात मागासलेली समजली जाते. धावड समाजाची आणि इतर मुसलमानांची मशीद वेगवेगळी आहे. या सर्व जातीमध्ये आपापसात लग्नव्यवहार होत नाही.

८. 'इंडियन एक्स्प्रेस'च्या ११।८।८१ च्या वार्तेत म्हटले आहे : तमिळनाडूच्या रामनाड जिल्ह्यातील इलमनूर गावात नुकताच इस्लाम स्वीकारलेल्या (बालया) मुसलमानाबरोबर तिथले खानदानी मुसलमान एका मशिदीत नमाज पढायलाही तयार नाहीत !

९. पुन्हा अरबी अहंगंड काही वेगळाच आहे. मक्केला जाणारे कित्येकजण सांगतात की, अरब मुसलमान इतर देशातील नि भारतातीलही मुसलमानांना स्वतःपेक्षा हीन समजतात !

१०. १९५० च्या सुमारास पाकिस्तानात कादियानी मुसलमानांचे किती भयंकर हाल करण्यात आले, हे प्रसिद्धच आहे.

पृष्ठ २० वर

# उत्तरमीमांसा : २७ :

स. शि. भावे

## सत्तांतराचे ठराविक नाट्य....आणि पोकळ नाटकीपणा

राष्ट्राध्यक्ष अन्वर सादात याची भीषण हत्या झाली आणि इजिप्तमध्ये सत्तातर झाले. होस्नी (हुसेनी ? की हुसेन ?) मुबारक सत्तेवर आले.

मध्य-पूर्वेतील आणि अरबी राष्ट्रातील सत्तातराचा हा प्रकार आता नवा राहिलेला नाही. अशी बातमी वाचल्यानंतर पूर्वीसारखा धक्का हल्ली बसत नाही. सत्तांतराची ही रीतच झाली आहे

अशा सत्तांतरात नव्याने सत्तेवर येणाऱ्याचा आणि हात कसा असतो, हे अनेकदा उघड गुपित असते; पण अशा नव्या सत्ताधीशाना कोणीही गुन्हेगार समजत नाही. पडद्याआड गेलेल्या सत्ताधीशांसाठी कोणी खरे अश्रू ढाळत नाही. कारण ते याच मार्गाने सत्तेवर आलेले असतात.

आतरराष्ट्रीय कायद्यात आणि सबंधात प्रत्येक राष्ट्राचे सार्वभौमत्व पवित्र आणि अनुल्लंघनीय मानलेले आहे. त्यास अनुसरून इतर राष्ट्रे व राष्ट्रप्रमुख या नव्या राष्ट्रप्रमुखांचे स्वागत करतात, त्याना शुभेच्छा (!) देतात आणि त्या त्या राष्ट्राचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्याच्याशी वाटाघाटी करतात, तहनामे करतात, बरोबरीचे संबंध ठेवतात.

हीच रीत आहे. हीच सभ्यता आहे. त्या त्या राष्ट्रातील जनतेच्या मताने त्याचा सत्ताधीश हा त्याचा खरा प्रतिनिधी आहे की नाही, याचा विचार इतर राष्ट्र-प्रमुख करीत नाहीत. तसा विचार करण्याची आवश्यकताही त्याना वाटत नाही. कारण प्रत्येक राष्ट्रप्रमुखाला आपापल्या राष्ट्रात अशीच सार्वभौम, निरंकुश सत्ता हवी असते. या बाबीत जगातल्या सर्व राष्ट्र-प्रमुखांचे हितसबंध कायम असतात. या हितसबधांच्या एकात्मतेने सर्व राष्ट्रप्रमुखाचा एक शोषक वर्ग बनतो आणि शंभरातील साठ-सत्तर उदाहरणात त्याची त्याची राष्ट्रे आणि त्यातील आपल्यासारखी जनता या प्रमुखाच्या शोषणाचे राखीव कुरणच झालेले असते

राष्ट्रप्रमुख हे जगातल्या नायकापैकी (privilosed-peroons) सर्वांत अधिक सत्ताधीश असतात; पण कमी सत्ताधीश नायकांचा पवित्राही एकमेकांना मदत करण्याचाच असतो. परवा ऑस्ट्रेलियात पोचल्या पोचल्या दिलेल्या मुलाखतीत पाक-संघाचा कर्णधार **जावेद मियांदाद** याच कारणास्तव पत्रकाराना सागता झाला की, ऑस्ट्रेलियाच्या संघाला **किम हयूज** हाच कर्णधार पाहिजे ! ऑस्ट्रेलियन निवडसमितीने हा सल्ला मनावर घेतला नाही आणि **ग्रेग चॅपेल**कडेच कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली, हा भाग वेगळा.

मुद्दा हा की, जो तो सत्ताधीश, आपापल्या पातळीवरील इतर सत्ताधीशाचा हितसंबध साभाळीत असतो. या कर्तव्यात मग धर्म, वंश, राष्ट्र असे भेद आड येत नाहीत. नैतिक-अनैतिक असा विवेकही आवश्यक वाटत नाही. लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेले राष्ट्रप्रमुख आणि हुकुमशाही किंवा लष्करशाही खुनशीपणाने सत्तेवर आलेले राष्ट्रप्रमुख, हे समान नैतिक अधिकाराने परस्पर व्यवहार करतात. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात हेच प्रतिष्ठितपणाचे मानले जाते. विचारवंतदेखील क्वचितच याला विरोध करतात. कवी आणि कलावंत मात्र आपापल्या निर्मितीत या संभावित गुंडगिरीला विरोध करतात. सामान्य वाचकांपर्यंत हा विरोध पोचतो; पण ते तितकेच. कलावत काय आणि सामान्य माणूस काय, त्याच्याजवळ यापेक्षा अधिक 'बळ' नसते.

¤

अशा खुनशी सत्तातराचे तंत्र आणि त्यातले नाट्य, हे अगदी ठरलेले असते. मग हे सत्तातर कोरियात घडो, व्हिएतनाममध्ये घडो, इराणमध्ये घडो की आणखी कुठे.

**कृती एक :** सत्ताधीशाचा खून होणे. यात आकस्मिकपणाचा भाग अर्थातच असतो. कट वगैरे घडला आहे असे दृश्य बाहेर दिसते. म्हणजे तसा कट असतोच; पण जो वरवर दिसतो तो हा खरा कट नसतो. तर वरवरचा कट हा खरा कट दिसावा, अशी पूर्वयोजना करणारा जो तळचा कट असतो, तो खरा कट असतो.

या कृतीत मुख्य सत्ताधीश, त्याचे इमानी सहकारी व सेवक, अन्य प्रमुख व्यक्ती गोळीबारात किंवा बॉम्बने ठार वा जखमी होतात. मात्र नंतर सत्ताधीश होणाऱ्या व्यक्ती, जवळ असूनही चमत्कारानेच वाचतात. असे वाचल्याबद्दल त्या त्या व्यक्तींना विलक्षण शोक होतो. गारद्यांच्या गर्दीत नारायणराव मारले जातात; पण रघुनाथराव वाचतात त्यातलाच हा प्रकार !

**कृती दोन :** राष्ट्रात आणीबाणी जाहीर होते. माथेफिरू गुन्हेगार किंवा अतिरेकी संघटना यांना दोष देण्यात येतो. दरम्यान खून करणाऱ्या व्यक्ती पकडण्याच्या आधी किंवा नतर अचानक मरतात. ली हार्वे ओस्वाल्ड मेला तसा. त्याचप्रमाणे, खुन्यांच्या जवळच्या आणि माहितगार व्यक्ती अचानक परागंदा होतात अगर अपघातात सापडतात गुन्ह्याची चौकशी अर्थातच चालू राहते. त्यासाठी खास अधिकाराचे खास आयोग नेमले जातात. गुन्हेगारांना, गुन्हा सिद्ध झाल्यावर, 'कडीसे कडी' सजा देण्याचा निर्धार वारंवार व्यक्त करण्यात येतो.

[ कंसात : कृती एक व कृती दोनमध्ये, काही वेळा, एक पर्याय (Variation) दिसून येतो. कृती एकमध्ये, प्रमुख एकाएकी आजारी होतात. नंतरचा सत्ताधीश तात्पुरता प्रमुख म्हणून, आजारी झालेल्या प्रमुखाच्या आदेशानुसार (!) काम पाहू लागतो. वैद्यकीय उपचाराची शर्थ होते; पण प्रमुख वाचू शकत नाही. या मुदतीत नवा सत्ताधीश, जुन्या प्रमुखाना आराम मिळावा म्हणून रोज प्रार्थना वगैरे करतो. या जल्लोषात सामान्य माणसे सामील होतातच. स्टालिनच्या वेळेला हा पर्याय वापरला गेला होता.

कृती दोनचा पर्याय म्हणजे खुन्यांनी फरारी होणे, शेजारी राष्ट्रात गुप्त ठिकाणी जाणे आणि तत्त्वासाठी हत्या केली असे प्रकट करणे. यात सत्तांतराला तात्त्विक धर्मयुद्धाचे रूप देण्याचा प्रयत्न असतो. ]

**कृती तीन** : दीर्घ काळाचा राष्ट्रीय शोक जाहीर होतो, शाही इतमामाने व्हावयाच्या अंत्यविधीचा तपशील पक्का होतो. देशोदेशीचे राष्ट्रप्रमुख आपण येणार, असे जाहीर करतात. त्यांच्या आगवानीचा शिष्टाचार नक्की होतो.

या शोक-प्रदर्शनातच राष्ट्रप्रमुखांना एकमेकांना भेटायचे असते. एकमेकांना आणि नव्या राष्ट्रप्रमुखांना चाचपून घ्यायचे असते. मोठाच गदारोळ उठतो. सामान्य जनता थक्क होते. तिचे डोळे दिपून जातात.

प्रत्यक्ष अंत्यविधीआधी दिवंगत राष्ट्रप्रमुखाचे शव जनतेच्या दर्शनार्थ व्यवस्थित तयार करून ठेवतात. लोकांचा क्यू. दर्शनासाठी अष्टौप्रहर पहारा. वातावरण कसे शोकाने भिजलेले, गंभीर, उदात्त–साऱ्यांनाच उदात्ततेत भिजवून टाकणारे–तयार होते–केले जाते. सामूहिक प्रसारमाध्यमांचा (टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे, चित्रपटगृहे इत्यादी) हे वातावरण तयार करण्यासाठी खास उपयोग केला जातो. या गंभीर उदात्ततेने नव्या बंडाची शक्यता कमी होते. नव्या सत्ताधीशाला आपला जम बसवायला अवसर मिळतो.

**कृती चार** : कृती एक–दोन–तीन अशा शिखराकडे चढत जातात. कृती चारपासून शेवटाकडे जाणारा उतार सुरू होतो. चौथ्या टप्प्यात, आधीच्या राष्ट्रप्रमुखाबद्दल, त्याने पुरस्कारिलेल्या तत्त्वाबाबत उच्च रवाने आणि सतत निष्ठा व्यक्त केली जाते. त्या तत्त्वाच्या शत्रूचा निःपात करण्याची घोषणा वारंवार होते. हा निःपात करण्याच्या नावाखाली जुन्या राष्ट्रप्रमुखाच्या निष्ठावंत सहकाऱ्यांना हळूहळू, एकेक करून दूर केले जाते किंवा सरळ शांतपणाने संपवले जाते. याच निमित्ताने, नव्या सत्ताधीशाच्या विश्वासातले नग एकेक करून महत्त्वाच्या स्थानांवर बसवले जातात.

एक ते चार वर्षे हा बदल संथपणे सुरू असतो. या अवधीत जुन्या, मारलेल्या राष्ट्रप्रमुखाची वार्षिक स्मरणे जोरजोरात, आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीच्या झोतात साजरी होतात. त्या जुन्या राष्ट्रप्रमुखाच्या नावाने राष्ट्रीय सन्मान, आंतरराष्ट्रीय पारितोषिके जाहीर होतात, त्या त्या राष्ट्राच्या हितसंबंधांप्रमाणे ती (नोबेल शांतता पुरस्काराप्रमाणे) दिली जातात.

मारलेल्या राष्ट्रप्रमुखाच्या नावाने भव्य स्मारक उभे राहते. त्याच्या कुटुंबियांच्या साऱ्या जुन्या सवलती कायम राहतील असे तत्काळ जाहीर होते. त्यांना मोठे पेन्शन दिले जाणार, असेही जाहीर होते. (प्रत्यक्षात हे कुटुंबीय नजरकैदेत असल्यासारखे असतात.)

असे सारे स्थिरस्थावर झाल्यावर नवा राष्ट्रप्रमुख शेवटच्या कृतीला तयार होतो.

**कृती पाचवी** : ही कृती म्हणजे जुन्या राष्ट्रप्रमुखाचे मूर्तिभंजन.

चार–पाच वर्षांनंतर हा कृतिविधी सुरू होतो. सुरुवातीला मृत राष्ट्रप्रमुखाची सार्वजनिक ठिकाणी असलेली भव्य छायाचित्रे अलगद नाहीशी होतात.

नंतर त्याच्या काही मर्यादा खेदपूर्वक मान्य कराव्या लागत आहेत, असे जाहीर होते. नंतर सामान्य नागरिकाना त्याचा अन्यायी व जुलमी कारभार कसा सोसावा लागला याच्या कहाण्या योजनापूर्वक, क्रमाक्रमाने बाहेर येऊ लागतात. दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे या माध्यमांतून आणि अधिकृत सभा–समारंभांतून त्याचे आधी होत असलेले गुणवर्णन बंद पडते आणि त्याजागी 'परखड', 'वस्तुनिष्ठ' मूल्यमापनाची काही वाक्ये येऊ लागतात.

अशी सारी जय्यत तयारी झाली की, 'तो' दिवस उगवतो.

त्या दिवशी नवा राष्ट्रप्रमुख, अत्यंत दुःखाने, मारलेल्या राष्ट्रप्रमुखाच्या जुलमीपणाचा, नाकर्तेपणाचा, भ्याड निर्णयांचा, भ्रष्टाचाराचा, अखेरच्या दिवसांतील बुद्धिभ्रंशाचा पाढा वाचतो. त्याच्या काळ्या राजवटीबद्दल आणि त्या राजवटीच्या काळात स्वतः भित्रेपणा ('तुम्ही सारे समजू शकाल!') दाखवल्याबद्दल जनतेची क्षमा मागतो. जुन्या राष्ट्रप्रमुखाला अधिकृतपणे कायमचा इतिहासजमा करतो.

जनता या 'सत्य'–कथनाने थरारते, गहिवरते, जुन्या राष्ट्रप्रमुखाच्या नावाने, 'वाटलंच होतं' अशा तऱ्हेचे, शिव्याशाप देते, नव्या राष्ट्रप्रमुखाचा 'जुना' नाइलाज समजून घेते, या पाचव्या कृतीतील क्षमायाचनेच्या प्राजळ देखाव्याने भारली जाते, उदात्त होते, नव्या सत्ताधीशाला मनोमन शुभ चिंतून त्याचा स्वीकार करते.

असे हे उदात्त, शोकगर्भ, जनतेला तऱ्हेतऱ्हेच्या भावनोद्रेकाचे आणि भावनाविरेचनाचे समाधान देणारे पाच कृतीचे, पाच अंकी नाटक संपते. नव्या पाच अंकी नाटकाची प्रतीक्षा सुरू करून संपते.

¤

ईजिप्तमध्ये या नाटकाचे पहिले काही अंक झपाट्याने पार पडत आहेत. उत्तरार्धाची चाहूल एव्हाच लागू लागली आहे.

शांततेचे आणि इस्रायलशी समझोत्याचे पूर्वीचे धोरण ईजिप्त कायम ठेवील, असे **होस्नी मुबारक** यानी आरंभी जाहीर केले होते. अमेरिकेशी मैत्री, अमेरिकेचे मार्गदर्शन व अमेरिकेचा आधार ही या धोरणाची चौकटही मुबारक यानी अधिकृतपणे मान्य केली आहे. सुदानवर लीबियाने हल्ला केला तर ईजिप्त लीबियावर स्वारी करील आणि अशा प्रसंगी अमेरिका ईजिप्तच्या संरक्षणाची हमी देईल–अशी बातमी नुकतीच बाहेर 'फुटू' दिली गेली. अमेरिकन मुत्सद्द्यानी असे आश्वासन दिले याला अमेरिकन परराष्ट्र–खात्याच्या प्रवक्त्याने दुजोराही दिला नाही, की या बातमीचा इन्कारही केला नाही. अमेरिकी चौकट कायम आहे, हेच या घटनांनी स्पष्ट होत आहे.

मात्र, याच वेळी होस्नी मुबारक यानी असेही प्रकट केले आहे की, अरब राष्ट्राशी मित्रतापूर्ण परस्पर संवाद साधण्याची ईजिप्तला उत्सुकता आहे. याचा अर्थ इतकाच की, अमेरिकी चौकटीचा आधार घेता घेता भावी काळात नवे आधार मिळण्याची शक्यता **मुबारक** चाचपून पाहत आहेत. तसे आधार त्यांना मिळाले की, ज्यूविरोधी रशियाचा पाठिंबा असलेल्या अरब राष्ट्रमंडळात राहणे त्याना अधिक सुरक्षित वाटेल आणि योग्य वेळी ते तसे जाहीर करतील.

¤

अधिक विचार करता हे जाणवते की, सत्तांतर म्हणजे सत्तांतर. या नाटकाचे टप्पे आणि अंक सगळीकडे सारखेच असतात.

पात्रांप्रमाणे, भाषेप्रमाणे काही काही संवाद बदलतात इतकेच. हुकूमशाही राजवटीत हुकूमशाही संवाद असतात, तर लोकशाही राजवटीतील संवादांची लय, धाटणी लोकशाही 'रीती' ची असते. 'बटाट्याच्या चाळी'त पु. ल देशपांडे यानी म्हटल्याप्रमाणे 'उर्वशी' चा 'सौध' आणि 'चंपी' ची 'ग्यालरी' इतकाच फरक. बाकी आशय तोच असतो.

स्टालिन आजारी झाला ही बातमी बरेच दिवस तशी झाकूनच ठेवण्यात आली होती. भुवनेश्वरनंतर पंडितजींच्या प्रकृतीची किती गंभीर नुकसानी झाली होती याची खरी कल्पना आपल्याला देण्यात आली नव्हती.

स्टालिनच्या निधनानंतर, मालेन्कोव्ह, बेरिया इत्यादीनी एकत्र राहण्याची आणि जुने धोरण पुढे चालवण्याची शपथ घेतली आणि जनतेला तसे आश्वासन दिले. पंडितजींच्या निधनानंतर काँग्रेसच्या सर्व नेत्यानी असेच एकीचे, देशभक्तीचे, कार्यक्षमतेचे, सेवावृत्तीचे आश्वासन जनतेला दिले होते. इंदिरा गांधींच्या निवडणुकीतील पराभवानंतर जनता पक्षाच्या खासदारानी, राजघाटावर, गांधीजींच्या समाधीच्या साक्षीने, जयप्रकाशजी आणि कृपलानीजी याच्या उपस्थितीत असेच उदात्त, नैतिक इत्यादी आश्वासन 'भारतोय जनते'ला (म्हणजे आपल्याला) दिले होते.

या आश्वासनाचे काय झाले ते आपण जाणतो. कारण आपण ते अनुभवले आहे व अनुभवतो आहोत.

व्यक्तिमाहात्म्याचे नाट्यदेखील असेच बदलते आहे.

अठ्ठेचाळीस साली गाधीजीचा खून झाला त्या रात्री आकाशवाणीवर भाषण करताना पंडितजी, सरदार, मौलाना या साऱ्यानी महात्माजीचा व त्याच्या तत्त्वज्ञानाचा आदर्श पाळण्याचे आश्वासन 'जनते'ला दिले होते.

नंतर दोन वर्षांत सरदार गेले. मौलाना गेले. बावन्न साली पडितजीनी जो निवडणूक-प्रचार केला त्यात गाधीजीचे नावच मुख्यतः स्मरले. सत्तावनच्या निवडणूक-प्रचारात गाधीजी जवळजवळ अदृश्य झाले होते. पंडितजीच्या निधनानंतर जुन्या राष्ट्रप्रमुखाची जागा त्यांनी घेतली. गाधीजी आणखीच जुने झाले. पक्षोपपक्षांच्या अधिवेशनात प्रथम त्यांच्या छायाचित्राचा आकार कमी झाला. नंतर छायाचित्रेच अंतर्धान पावली !

एकूण काय, हुकूमशाही असो, लोकशाही असो, नाटक तेच. त्यातील भावनांचा आविष्कारही तोच, तसाच.

¤

या साऱ्यात तसे खास वाईट वाटण्याजोगे काही नाही. हा बदल, जुन्याचा पडणारा हा विसर, हे सारे नैसर्गिक आहे. वाईट वाटते ते यातील खोटेपणाने या साऱ्यातच जो नाटकीपणा भरून राहतो त्याचे आणि राग येतो तो बडयाच्या नाट्यात सामान्य माणसाना गृहीत धरले जाते आणि त्यांचा वापर केला जातो याचा. सत्ताधीशाचा हा 'खेळ' होतो, सामान्याचा मात्र यात जीव जातो.

अर्थात, सामान्य माणसेही वाटते तेवढी सामान्य नसतात. सामान्य माणसे ही बहुधा परिस्थितीने सामान्य असतात, बुद्धीने नव्हे. बडयांच्या नाटकातले क्रौर्य, त्यातली अमानुषता, त्यातला लटकेपणा हे त्याच्या ध्यानात येत असते. या साऱ्यातला अतीव पशुपणा, व्यर्थपणा आणि बडयाच्या वाटयाला अपरिहार्यपणे येणारा आतला पोकळपणा याचाही त्याना चागला पत्ता असतो. खरे तर आपणच अधिक सुखी व समाधानी असतो, हेही त्यांना उत्तमपैकी जाणवत असते. जुन्या राष्ट्रप्रमुखाचा खून होणे, नव्याचे सत्तेवर येणे, त्याचा पुन्हा खून होणे—या त्याच्या लेखी केवळ बातम्या असतात.

म्हणून जसा त्याचा जीव जातो, तसाच सत्ताधीशांचाही जातो. सामान्यांचे निर्मळ हसणे मात्र सत्ताधीशांच्या (किंवा सत्ता-लोभ्याच्या) दैवी लिहिलेले नसते ! □


## NEW TITLES RECEIVED

१. तराळ-अंतराळ (आत्मचरित्र)—शंकरराव खरात
२. माझ्या मना तुझ्या मना (कादंबरी)—चिंतामणी लागू
३. हल्दीघाटीतून कुलूघाटीत (प्रवासवर्णन)—सौ. मेधा काळे
४. धुमाकूळ (गुन्हेगार-कथा)—प्रमोद नवलकर
५. कमळण (कथा)—अरविंद गोखले

### ENGLISH

1. Men of Men (Thriller)–Wilbur- Smith
2. The Killing In The Market (Thriller) –John Ball with Bevan Smith
3. Cricket's Great Families–Kersi Meher Homji
4. The Encyclopedia of Astrology–Sandra Shulman.

□ हॅझलिट् म्हणतात, "निर्जीव वस्तूंपासून मिळवण्यासारखी पवित्र व शाश्वत अशी तीन सुखे आयुष्यात आहेत आणि ती म्हणजे ग्रंथ, चित्रे आणि निसर्ग ही होत." सध्याच्या असुरक्षित जीवनात अशाश्वत गोष्टींच्या मागे लागण्यापेक्षा वरील शाश्वत सुखांपैकी ग्रंथांमधून मिळतील तेवढी ज्ञानरत्ने दोन्ही दोन्ही हातांनी वेचा. अशा रत्नांची पेढी म्हणजेच—फिनिक्स लायब्ररी !!

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ पोस्टासमोर, पुणे ३०

अवती–भवती । शरद कृष्णन

## □ खलिस्तान–अतिरेक्यांचे धोकादायक स्वप्न

शीख समाजामधील काही अतिरेक्या मंडळीनी स्वतंत्र,सार्वभौम खलिस्तानच्या मागणीवरून वादळ उठवले असले आणि परदेशामध्ये मोठी प्रचार–आघाडी उघडली असली तरी या चळवळीला शीख समाजाचा मोठा पाठिंबा नाही. 'इंडिया टु डे' या पाक्षिकाने अलीकडेच या संदर्भात केलेल्या पाहणीत असे आढळून आले आहे की, या मागणीला शीख समाजाचा मोठा पाठिंबा नाही. अमृतसर आणि जालदर या शीख वसाहतीच्या प्रमुख शहरातून एक हजार नागरिकाच्या प्रतिक्रिया अजमावून पाहिल्या असता या मागणीला जराही पाठिंबा नाही असेच दिसून आले. या चाचपणीमध्ये एकूण सहा प्रश्न विचारण्यात आले होते. त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता की, स्वतंत्र खलिस्तानची मागणी तुम्हाला मान्य आहे का ? या प्रश्नाला जवळजवळ ९०% मडळीनी सुस्पष्ट नकारात्मक उत्तर दिले. केवळ २ टक्के व्यक्तीनी आपण काहीच सांगू शकत नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली, तर केवळ ८ टक्के व्यक्तीनी या मागणीचा पुरस्कार केला. या प्रश्नमालिकेमध्ये आणखी खालील प्रश्न विचारण्यात आले होते. विमान पळवून नेण्यासारखे अतिरेकी कृत्य तुम्हाला मान्य आहे का ? सत जर्नेल सिंग भिंदरवाले हेच शीख समाजाचे खरे नेतृत्व करतात हे आपणास मान्य आहे का? खलिस्तान चळवळीशी संबंधित असलेल्याविरुद्ध कठोर कारवाई करावी असे आपणास वाटते का ? शीख–समाजाचे खरे नेतृत्व अकाली–दल करतो असे आपल्याला वाटते का ? आणि पंजाब राज्याची अनेक प्रामाणिक गाऱ्हाणी दुर्लक्षित होतात अशी आपली भावना आहे का ? या विविध प्रश्नाना जी उत्तरे मिळाली आहेत त्याची छाननी करता, खलिस्तानच्या मागणीला पाठिंबा तर नाहीच; परंतु याबाबत शासनाने कठोर कारवाई करावी असेच सुस्पष्ट मत या चाचणीमध्ये नोदले गेले आहे. अकाली-दल शीख समाजाचे नेतृत्व करतो अशीच ४० टक्के शीख समाजाची भावना आहे असे ही चाचपणी सागत असली तरी अकाली दलाची पहिली लोकप्रियता आज पहावयास मिळत नाही. अकाली दलाचे धार्मिक नेतृत्व मान्य करणारे शीखही आज निवडणूक घेण्यात आली तर इदिरा काँग्रेसला आपण मतदान करू असे सागतात. या प्रश्नाला आलेल्या उत्तराची टक्केवारी पाहता कोणत्याही एका पक्षाच्या बाजूने निर्विवाद कल नसला तरी इदिरा काँग्रेसलाच वातावरण जास्तीत जास्त अनुकूल असल्याचे दिसून येते. खलिस्तानबाबतच्या प्रश्नाना मिळालेल्या उत्तरावरून वातावरण खलिस्तान–चळवळीला विरोधी असले तरी अतिरेक्यांमार्फत खलिस्तानची ही मागणी नेट लावून रेटली जात आहे आणि याबाबतचे वातावरण परदेशात तापवले जात आहे. कॅनडामध्ये असलेल्या ६५ हजार भारतीयापैकी जवळजवळ ७५ टक्के शीख आहेत आणि तेथील शीख समाजात अपप्रचार करून या चळवळीला खतपाणी घालण्यात येत आहे. इतकेच नव्हे तर या चळवळीला फार मोठा पाठिंबा असल्याचा धादात खोटा प्रचार परदेशातून केला जात आहे. भारताबाबत अनुदार धोरण स्वीकारणाऱ्या आणि भारताची अंतर्गत परिस्थिती अशात रहावी असे वाटणाऱ्या हितशत्रूकडून खलिस्तान चळवळीबाबतचे खोटे–भडक चित्र रंगवण्यात येत आहे. इतकेच नव्हे तर या चळवळीला अप्रत्यक्षरीत्या सहकार्यही दिले जात आहे. शीख समाज हा आपल्या धार्मिक भावनांना विशेष जपत असला तरी खलिस्तानसारख्या अतिरेकी चळवळीला या समाजाचा पाठिंबा नाही. पजाबमध्ये शीख समाजाला पूर्ण सुविधा व समान संधी उपलब्ध असल्याचे पंजाबचे मुख्यमंत्री दरबारा सिंग सागतात, तर असेच विधान केंद्रीय गृहमंत्री–ग्यानी झैलसिंगही करतात. अकाली दलाची खरी शक्ती गुरुद्वाराच्या आर्थिक सामर्थ्यावर उभी आहे. धार्मिक नेतृत्वाचे राजकीय विचारही शीख समाजाकडून मोठ्या प्रमाणात स्वीकारले जात असल्याचा अनुभव आहे. मास्टर तारासिंग व त्यानतर गुरुद्वाराच्या माध्यमातून आलेल्या नेतृत्वाचा शीख समाजाकडून मोठ्या प्रमाणावर स्वीकार झालेला आहे. गुरुद्वाराची आर्थिक ताकद लक्षात आणून देण्याच्या दृष्टीने एक गोष्ट आवश्यक वाटते. शिरोमणी गुरुद्वारप्रबधक समिती ही गुरुद्वाराचे नियंत्रण करणारी समिती १०० प्रमुख गुरुद्वाराचे नियत्रण करते. या समितीवर ३२ सदस्य असून समितीच्या अध्यक्षाच्या हाती गुरुद्वाराच्या वार्षिक उत्पन्नाचा कसा वापर करावा याबाबतचे अधिकार असतात. ही रक्कम ५ कोटी रुपयांहून जास्त आहे. अकाली–नेतृत्वाने गुरुद्वार समितीवर बहुमत मिळवून धार्मिक व्यासपीठाचा राजकीय कारणासाठी जो वापर केला त्याबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांनी विलक्षण नाराजी व्यक्त केली आहे. अकालीदलाकडून गुरुद्वाराचा गैरवापर केला जातो. धार्मिक कारणासाठी देण्यात आलेला पैसा राजकीय उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी वापरला जातो. खलिस्तानच्या मागणीबाबत जाहोररीत्या त्यानी कठोर टीका केली असूनही विक्षिप्त मागणी करणारे मूठभर लोक विकृत मनोवृत्तीचे आहत असेही विधान केल आहे. खलिस्तानची मागणी राष्ट्रविरोधी आहे असे नव्हे तर शीख समाजाच्या दृष्टीनेही हानिकारक आहे. शीख समाजाला दुय्यम दर्जाची वागणूक मिळते हा दावाही झैलसिंग याना अमान्य आहे. ते म्हणतात–' शासनामध्ये, शासकीय सेवामध्ये आणि अन्यत्र आमच्या समाजाला गुणवत्तेप्रमाणे पुरेपूर प्रतिनिधित्व मिळते. एकूण केंद्रीय सेवकापैकी ८ टक्के शीख आहेत, आय्. ए. एस्. श्रेणीमध्ये दर सोळा अधिकाऱ्यामागे एक शीख असं प्रमाण असून या श्रेणीत २५६ शीख–अधिकारी आहेत. १८० सार्वजनिक उद्योगापैकी १६ उद्योग–धद्याच्या प्रमुख व्यवस्थापनपदी शीख व्यक्ती आहे. व्यापार–उदीमामध्ये तर आमचा समाज आघाडीवर आहेच; परतु शिखाच्या दृष्टीने खरो अभिमानास्पद कामगिरी म्हणजे सेनादलाच्या तिन्ही विभागात, अधिकाराच्या अनेक जागी शीख समाजाची माणसे आहेत. केवळ शीख म्हणून आपल्याला दुय्यम वागणूक दिली जाते असे सिद्ध करणारे एक जरो उदाहरण माझ्यासमोर आणले तरी मी माझे याबाबतचे विचार तपासून पाहीन; परंतु केवळ मूर्ख महत्त्वाकाक्षेपायी कोणी काहीही बरळू लागले, तरा त्याचा कठोरपणे बंदोबस्त करणे हो मी माझो जबाबदारी समजेन.

शीख समाजाच्या काही मागण्या असतील तर त्यावर विचार करता येईल; परंतु १९४२ पासून मूळ धरून असलेली आणि वेळोवेळी डोके वर काढणारी खलिस्तानची मागणी कदापी विचारासाठी सुद्धा घेता येणार नाही. गृहमंत्री जरी असे आक्रमक बोलत असले तरी आतून त्यांची या चळवळीला सहानुभूती असल्याचे बोलले जाते. खेरीज पंजबचे स्वपक्षीय मुख्यमत्री दरबारासिंग व त्याचे बरे नाही. या प्रकरणी दरबारासिंग अपयशी ठरले तर तेही त्यांना हवेच आहे. दुसऱ्या बाजूने अतिरेक्याना शीख समाजाची वाढती सहानभूती मिळत असल्याचे दिसते आहे. चाचणी मतदान काहीही सागत असले तरी आपल्या पत्रातुन राष्ट्रीय भूमिकेचा हिरीरीने पुरस्कार करणाऱ्या लाल जगतनारायण याच्या खुनाबाबत ज्याना पकडण्यात आले होते ते संत–जर्नेलसिंग भिंद्रानवाले सध्या पंजाबमध्ये अफाट लोकप्रिय आहेत. चाचणी मतदानातही असे दिसून आले आहे की, त्यांची लोकप्रियता विलक्षण वाढली आहे. खलिस्तानच्या मागणीने जोर धरला नसला तरी शीख समाजामधील मूठभर अतिरेकी या मागणीचा पुरस्कार करतात,. ही गोष्ट शिखेतर समाजाला रुचली नसल्याने वातावरण तणावाचेच आहे. देशाला इतर अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न भेडसावत असतानाच, सीमेवरील या महत्त्वपूर्ण राज्यामधील राजकीय तणाव वाढीला लागले असून केंद्रीय नेतृत्वाने त्याची वेळीच दखल घेतली नाही तर प्रकरण जास्त चिघळेल असे आत्ताच्या परिस्थितीवरून वाटते.

## □ तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणतात....

१९६७ साली सी. एन. अण्णादुराई तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले आणि या राज्यातून राष्ट्रीय पातळीवरील पक्षांची जवळजवळ हकालपट्टी झाली. राज्यामधील सर्वांत लोकप्रिय पक्ष डी. एम. के. अण्णादुराई याच्या निधनानंतर लवकरच पक्षात मोठी फाटाफूट झाली आणि काहीशा अनपेक्षितपणे एम. जी. रामचद्रन याचा अण्णा डी. एम. के. पक्ष सत्तेवर आला. १९७७ साली रामचंद्रन सत्तेवर आले. पुढे इंदिराजीनी त्याचे सरकार पदभ्रष्ट केले. लोकसभा निवडणुकीमध्ये इदिराजीना मोठे यश मिळाल्यावर राज्यामधील परिस्थिती बदलेल अशी अपेक्षा होती; पण परिस्थितीमध्ये फरक पडला नाही. रामचंद्रन पुन्हा सत्तेवर आले. राष्ट्रीय पातळीवरील कोणत्याच पक्षाचे तामिळनाडूबाबत खास धोरण नाही. सोयीप्रमाणे आणि परस्पर गरजेप्रमाणे कधी डी. एम. के., तर कधी ए. आय. डी. एम. के. याच्याशी जवळीक करण्यात आली. सध्या एम. जी. आर. जोरात आहेत, सत्तास्थानी आहेत. स्वाभाविकपणे इंदिरा काँग्रेसपासून सर्वांनाच त्याचे सहकार्य मिळाले तर हवे आहे. तामिळनाडूमध्ये जी निवडणूक होऊ घातली आहे त्या निवडणुकीसाठी इंदिरा काँग्रेसने आपला स्वतंत्र उमेदवार उभा केला आहे; पण डी. एम. के. बरोबर असलेला समझोता न तोडता अण्णा डी. एम. के. चे सहकार्य मिळावे अशा पद्धतीने पावले टाकली आहेत. एम. जी. आर. ही केंद्र शासनाबरोबर चांगले संबंध ठेवण्यास उत्सुक आहेत. केंद्रस्थानी जनता शासन होते तेव्हा त्याचे त्या सरकारबरोबर चागले सबंध होते. जनता शासन जाऊन इंदिरा सरकार आल्यावर त्यांनी या सरकारबरोबरही नरमाईचेच धोरण ठेवले आहे. ज्याच्यामुळे आपला लाभ होईल असे धोरण तामिळी मंडळी नोकरी-पेशात वापरतात. एम. जी. आर. तेच धोरण राजकीय पातळीवर वापरत आहेत. त्याचे राजकारण तत्त्वाचे नाही तर सोईचे आहे आणि सोयीच्या या राजकारणामध्ये इंदिरा काँग्रेसबरोबर मेतकूट जमवता आले तर ते त्याना हवे आहे. रुपेरी पडद्यावरून राजसिंहासनावर विराजमान झालेले एम. जी. आर. फारशा मुलाखती वगैरे देत नाहीत; परंतु अलीकडेच त्यांनी काही निवडक प्रश्नांना एका मुलाखतीमध्ये उत्तरे दिली होती. त्यापैकी विशेष महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या प्रश्नांची दखल येथे घेत आहे. आपल्या शासनाने बजावलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीबद्दल बोलताना रामचंद्रन म्हणतात-माझ्या दृष्टीने राज्यासमोरील काय किवा देशासमोरील काय, सगळ्यात महत्त्वपूर्ण प्रश्न दोन आहेत. एक लोकसंख्येचा आणि दुसरा रोजगार उपलब्ध करून देण्याचा. या दोन्ही प्रश्नांवर मी माझे लक्ष केंद्रित केले आहे. हँडलूम व्यवसायामध्ये गेल्या वर्षभरात सुमारे एक लाख लोकांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. काड्यापेटचा तयार करणाऱ्या कारखान्यातही दीड लाख लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. त्यामध्ये सुमारे २० हजार गरजू महिलाचा समावेश आहे. शाळेत शिक्षक म्हणून काम करणाऱ्या २ लाख ६८ हजार शिक्षकाना आपल्या नोकरीबाबत विलक्षण चिंता वाटत असे. शालेय व्यवस्थापन आपल्या मर्जीप्रमाणे शिक्षकाना नाचवत असे. या सर्व शिक्षकाना आता सरकारी नोकरीचा दर्जा देण्यात आला असून, सरकारी सेवेमध्ये असणाऱ्या मंडळीना दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधा आता शिक्षकांनाही लागू करण्यात आल्या आहेत.

शेतमजुराना निश्चित स्वरूपाचा किमान रोजगार देणे बंधनकारक करण्यात आले असून सुमारे २५ हजार वृद्ध शेतकऱ्याना निवृत्तिवेतन देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना निवृत्तिवेतन हा प्रकार केवळ माझ्याच राज्यात पहावयास मिळतो, याचा आपल्याला विशेष अभिमान वाटत असल्याचे सांगून एम. जी आर. म्हणतात–येत्या चार वर्षांत आणखी एक लाख वृद्ध शेतकऱ्याना या योजनेचा लाभ मिळू शकेल दलितासाठी व गोरगरिबांसाठी राबविण्यात येत असलेल्या काही विशिष्ट योजनाचा उल्लेख करून मुख्यमंत्री म्हणतात, खेड्यांमधील हरिजनाना वीज-पुरवठा करण्यास आम्ही प्रारंभ केला असून सुमारे ३ हजार हरिजनाच्या झोपड्यामधून वीज-पुरवठा करण्यात येत आहे. त्याच्याकडून केवळ दोन रुपये मासिक आकार घेण्यात येतो. स्त्रियासाठी ग्रामीण भागात स्वच्छतागृहे नसल्याने महिलाची मोठी गैरसोय होते. मी स्वत: व्यक्तिगत पातळीवर लक्ष घालून ५०० खेड्यांतून अशी स्वच्छतागृहे बांधून दिली आहेत. खर्चाच्या दृष्टीने विचार करता गोष्ट तशी साधीच असली तरी आपल्याकडे शासनाचे लक्ष आहे अशी भावना ग्रामीण भागामधील जनतेमध्ये तयार होणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने अशा साध्या साध्या गोष्टी उपयोगी पडू शकतात.

**प्रश्न :** केंद्र शासनाबाबतचा आपला दृष्टिकोन काय ?

**उत्तर :** आईला आपल्या सर्व मुलाकडे लक्ष द्यावे लागते. आता अशा मुलापैकी आक्रमक वृत्तीच्या मुलाना थोडा जास्त लाभ मिळतो हे खरे असले तरी आईचे इतर मुलाकडे लक्ष असतेच. केन्द्र व राज्य संबध हे असेच आई व मुलासारखे आहेत. ते तसेच साभाळून जेवढे

सहकार्य मिळवता येईल तेवढे आम्ही जरूर मिळवतो.

**प्रश्न :** इंदिरा कॉंग्रेसबाबत आपले धोरण काय ?

**उत्तर :** तंजावरमधून पोटनिवडणूक लढवण्याची इंदिराजींची इच्छा होती. त्या वेळचे पंतप्रधान मोरारजीभाई यांच्या सांगण्यावरून आम्ही अखेरच्या क्षणी पाठिंबा काढून घेतला, असे बोलले जाते ते खरे नाही; परंतु त्यामुळे इंदिराजी व त्यांचा पक्ष दुखावला गेला हे खरे आहे. तथापि आमचे संबंध आता निश्चित सुधारले असून आम्ही अधिक जवळ आलो आहोत. खेरीज, प्रादेशिक पातळीवर माझ्याच पक्षाला जनतेचा जोरदार पाठिंबा आहे, ही वस्तुस्थिती वादातीतपणे सिद्ध झाली आहे.

**प्रश्न :** करुणानिधी आणि त्यांचा डी. एम. के. पक्ष...

प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच एम. जी. आर. म्हणतात : करुणानिधी यांच्या पक्षाला राज्यात स्वतंत्र स्थान नाही. येथील मतदार राष्ट्रीय पातळीवर मतदान करताना वेगळा विचार करतो, तर विधानसभेसाठी मतदान करताना त्याची भूमिका वेगळी असते. करुणानिधी यांच्या पक्षाबरोबर हातमिळवणी करूनही विधानसभा निवडणुकीमध्ये इंदिरा कॉंग्रेस यश मिळवू शकली नाही, ही वस्तुस्थिती पुरेशी बोलकी आहे.

**प्रश्न :** आपला पक्ष हा एकखांबी तंबू आहे. आपल्यानंतर मा पक्षाचे भवितव्य काय ?

**उत्तर :** पक्षामध्ये माझे स्थान महत्त्वपूर्ण असले तरी पक्षाची विचारधारा जास्त महत्त्वाची आहे. अण्णादुराई यांची धोरणे आम्ही राबवतो. माझ्या पक्षात माझ्यापेक्षाही जास्त अनुभवी लोक आहेत आणि मी नसलो तरी आपला पक्ष ते उत्तम प्रकारे चालवतील अशी माझी त्यांच्याकडून अपेक्षा आहे.

**प्रश्न :** येत्या ५ ते १५ वर्षांमध्ये दक्षिणेकडील कोणी राजकीय नेता देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होऊ शकेल असे आपल्याला वाटते का ?

**उत्तर :** विद्यमान राजकीय परिस्थितीमध्ये असा संभव कमी दिसत असला तरी समजा काही चमत्कार होऊन दक्षिणेकडील व्यक्ती पंतप्रधान झाली तर त्याचा राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने बहुमोल उपयोग होऊ शकेल. माझ्यापुरते बोलायचे तर, मी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी किती काळ राहू शकतो ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. विवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०,


## □ दिवस क्रिकेटचे—सुनील गावस्करचे !

हो—नाही करता करता अखेरीस इंग्लंड संघाच्या दौऱ्यास मान्यता मिळाली आणि संघ भारतामध्ये येऊन दाखलही झाला. एक दिवसाच्या सामन्यामध्ये विजय संपादन करून पाहुण्यांनी आपल्या ताकदीची तशी चुणूक दाखवली आहे. अर्थात क्रिकेटशौकिनांचे लक्ष २७ नोव्हेंबरपासून मुंबईमध्ये सुरू होत असलेल्या कसोटी सामन्याकडे लागले आहे. मुंबईकर विशेष उत्सुक आहेत ते ४१ कसोटी सामन्यामधील यशस्वी कामगिरीनंतर वानखेडे स्टेडियमवर उतरणाऱ्या इयान बोथमचा खेळ पहाण्यासाठी. फलंदाज आणि गोलंदाज म्हणूनही त्याची अलीकडील कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी आहे. खेरीज कीथ फ्लेचरच्या नेतृत्वाखाली येत असलेल्या या संघामधील अन्य खेळाडूंपैकी जेफ बायकॉट, ग्रॅहॅम गूच, कर्णधार क्लीथ फ्लेचर यांच्या कामगिरीबाबतही मोठ्या अपेक्षा आहेत. बॉब विलिस आणि डेरेक अंडरवुड गोलंदाजीमध्ये काय चमत्कार करून दाखवतात इकडे शौकिनांचे लक्ष आहे. सांघिक ताकदीच्या तुलनेच्या दृष्टीने विचार करता दौऱ्यावर आलेला हा संघ भारतीय संघाला तसा भारीच आहे; पण तरीही भारतीय खेळपट्टीवर आणि प्रचंड दाद देणाऱ्या प्रेक्षकांच्या उपस्थितीमध्ये भारतीय संघाला पराभूत करणे वाटते तेवढे सोपे खचितच नाही. कसोटी मालिकेमधील अनेक संभाव्य खेळाडूंची देशांतर्गत स्पर्धांमधील कामगिरी निश्चितपणे उत्साहवर्धक आहे. कर्णधार सुनीलही सध्या चांगलाच फॉर्ममध्ये आहे. त्याच्या फलंदाजीमध्ये सातत्य नसले तरी तो सेट झाल्यावर लक्षवेधी कामगिरी करू शकतो. ६९ कसोटी सामने खेळलेला सुनील हाच भारतीय फलंदाजीचा मुख्य आधारस्तंभ आहे. त्याच्या नावावर कसोटी मालिकेमधील २३ शतके नोंदली गेली आहेत आणि कसोटीमधील त्याची सरासरी आहे ५३.१५ धावांची. तो आणि अन्य फलंदाज काय करतात यावरच या सहा कसोटी सामन्यांच्या मालिकेचे भवितव्य अवलंबून आहे. भारतीय खेळपट्टी ही मुख्यत्वे मंदगती गोलंदाजाना अनुकूल बनवली जाते. पाहुण्या संघाबरोबर उत्तम मंदगती गोलंदाज आहेत. चंद्रा—बेदी—प्रसन्ना हे विश्वविख्यात त्रिकूट आज इतिहासजमा झाले असले तरी दिलीप दोशी आणि अन्य सहकाऱ्यांकडून माफक अपेक्षा ठेवण्यास जागा आहे. तसे पाहिले तर, भारतीय फलंदाजांनी जेवढी निराशा केली आहे तेवढी निराशा गोलंदाजानी केलेली नाही आणि भारतीय फलंदाज जर उत्साहवर्धक धावसंख्या उभी करू शकले तर उमेदीने मैदानात उतरणारे गोलंदाज लक्षणीय कामगिरी करू शकतील. अर्थात नेमके काय होते ते लवकरच स्पष्ट होईल. सामन्याना तोंड लागलेच आहे आणि कसोटी सामनाही नजरेच्या टप्प्यात आहे. हा दौरा मार्गी लागल्याने भारतीय क्रिकेट-वर्तुळामध्ये एक नवे चैतन्य निर्माण झाले आहे. उत्साहाची ही उभारी भारतीय संघाने मजबूत कामगिरी बजावली तर टिकून राहू शकेल ! □




# श्यामची परदेश-प्रवासकथा (उत्तरार्ध)

• फिरोज़ रानडे •

असे करता करता, वा काही न करताच श्यामचा जाण्याचा दिवस उजाडला. सरकारी कामानिमित्त त्याने बराच वेळा विमानाने प्रवास केला होता. त्यामुळे व त्या प्रवासातल्या एकंदर अनुभवावरून त्याचे विमान–प्रवासाचे कौतुक खूपच झिरपून गेले होते. बाकी मराठी लेखकाकडे पाहून हवाई-सुदऱ्या गोडपणे हसत असल्या तरी आपल्याशी त्या जेवढ्यास तेवढास संबंध ठेवतात, हेही श्यामने बघून ठेवले होते. कदाचित त्यांना श्याम पुढे–मागे लेखक होणार आहे हे माहीत नसल्यामुळे त्या तसे वागत असतील. या सर्व अनुभवामुळे आपला विमानप्रवास फार काही रोमांचकारी होईल अशी त्याने अपेक्षा केली नव्हती.

बाकी साऱ्या लोकांना विसा, पासपोर्ट वगैरेची काळजी लागते तर श्यामला विसा, पासपोर्ट, अगदी विमानतळावर जाण्याकरता वाहनाची व्यवस्था वगैरे सगळे बिनबोभाट झाल्यामुळे आता आपले प्रवासवर्णन वाचनीय कसे होणार ह्याचीच काळजी लागली. श्यामची लग्न झालेली मुलगी पुण्याहून त्याला पोहोचवायला म्हणून मुद्दाम मुंबईला आली होती. त्याचप्रमाणे त्याचा मेहुणा, म्हणजे बायकोचा भाऊ पण पुण्याहून मुद्दाम आला होता. कॉलेजात जाणारी त्याची मुले पण विमानतळावर येणार होती. खरं म्हणजे त्या दिवशी टी. व्ही.वर लागणारा छान सिनेमा वडिलांमुळे बुडणार ह्याची त्यांना खूप रुखरुख लागली होती; पण जग-रहाटीकरता विमानतळावर येणे भागच होते. त्याचप्रमाणे श्यामचे दोन-चार मित्र पण विमानतळावर येणार होते. ते आम्ही विमानतळावर येणार, म्हणाले होते त्या वेळी श्याम त्यांना कशाला, कशाला म्हणाला होता. त्या वेळी श्यामला मित्र विमानतळावर पोहोचावयाला येणार म्हणून आनद झाला होता; पण तो त्यावेळी ! पाच वाजता गाडी-वानाने गाडी आणल्याचे सांगितले. मग थोडी तारांबळ उडाली. राधाचे प्रसंगाला योग्य असे कपडे करून होत होते. मुले केव्हाची तयार होऊन बसली होती. श्यामचे पण सूट घालणे, टाय बांधणे वगैरे चालले होते. तेवढ्यात त्याचा आणखी एक मित्र आला व 'हे काय ? तुमच्याकडे परदेशाला जाण्याचे काहीच वातावरण कसे दिसत नाही ? पुण्याला जायला निघाला आहेत असे वाटते आहे', असे बोलता झाला. श्याम कोट घालत बाहेरच्या खोलीत आला व म्हणाला, 'आमचे असेच आहे. पुण्याला जावयाचे असले म्हणजे परदेशाला जावयाचे वातावरण असते व परदेशाला जावयाचे असले म्हणजे पुण्याला जाण्याचे !' घरात पोहोचवणाऱ्याची संख्या वाढत चालली तसा श्याम खजील होत चालला. तो पोरांना म्हणाला 'अरे, राधाचे कपडे करून व्हायला वेळ लागणार असे दिसते. तुम्ही काकाना घेऊन खाली गाडीत जाऊन बसा बघू !' त्यावर काका व पुतणे एकदमच म्हणाले, 'बरोबरच खाली जाऊ या की, आधी जाऊन गाडीत बसण्यात काय फायदा ?' आता त्यांच्या पुढे जाण्याने काय 'फायदा' होणार आहे हे कसे सागावे ते श्यामला कळेना.

थोड्या वेळात राधा बाहेर आली. पांढऱ्या सिल्कच्या भारी साडीत ती भारीच कमनीय दिसत होती; पण काका-पुतण्यांच्या समोर तसा कमनीय दिसण्यात काही 'नफा' नव्हता.

'चला, निघू या !' श्याम भला मोठा

निश्वास टाकून म्हणाला. त्याच्या निश्वासाचा अर्थ समजून राधा खळखळून हसली. मग सगळे लिफ्टमध्ये उभे राहिले. तोच श्यामच्या लक्षात आले की, त्याचा चष्मा घरातच राहिला आहे. 'तुम्ही थावा येथेच. मी आणतो पटकन् माझा चष्मा !' श्याम म्हणाला. 'पण चावी माझ्याकडेच आहे' म्हणत राधा पण त्याचे मागे मागे आली. दोघे घरात आली त्या वेळी जे काय दोन-चार सेकंद मिळाले त्यात श्यामने शिताफीने चष्मा घेतला व राधाला किसले !

इंग्रजांच्या आपण किती तरी बऱ्या-वाईट गोष्टी घेतल्या; पण किसण्याबाबत म्हणजे सामाजिक पातळीवर किसण्याबाबत कशी काही पद्धत रूढ केली नाही ? लिफ्ट जशी खाली खाली चालली होती तसे श्यामचे विचार वर वर चालले होते. खरं म्हणजे 'किस' ह्या इंग्रजी क्रियापदाला चागला मराठी प्रतिशब्द नसावा ना? 'पापा' म्हटलं की, लहान मुलांच्या सबंधी वाटते. 'चुबन' शब्द कसा कर्कश वाटतो; पण आता एवढ्या घाईत योग्य प्रतिशब्द मिळणे अवघड होते. व नाही तरी आता पुरते किसून झालेच होते. तोपर्यंत लिफ्ट तळमजल्यावर आली व सगळे जण गाडीत जाऊन बसले.

पाच वाजल्यापासून श्यामने असे पक्के केले होते की, ह्यापुढे घड्याळात म्हणून पहावयाचे नाही. कारण मग उशीर होणार ह्या भीतीने छातीत धडधडायला लागले असते कारण आता निघायलाच साडेपाच वाजले असणार व श्यामच्या घरापासून विमानतळापर्यंत जायला निदान ४०–४५ मिनिटे तरी लागणार होती. त्यातून संध्याकाळची वेळ म्हणजे अगदी गर्दीची वेळ. विमान मिळो वा चुको. घड्याळात पहावयाचे नाही असे त्याने ठरवले होते.

¤

जणू ठरल्याप्रमाणे सगळी मंडळी ६॥ वाजता पोहोचली. 'सहार'च्या नव्या इमारतीत एकदम पहिल्या मजल्यावरच जावे लागते. नव्या इमारतीतल्या नव्या नियमाप्रमाणे पोहोचवायला येणाऱ्या माणसाना आत यायला बंदी होती. दुसरी एखादी वेळ असती तर श्यामने आपल्या सरकारी नोकरीच्या वजनाचा उपयोग केला असता; पण आधीच साडेसहा वाजले होते. तेव्हा पुतणे व काकालोक बाहेर उभे राहिले. त्याचा मेव्हणा व राधा तसेच दडपून आत आले.

विमान–सेवेच्या कट्ट्यावर बिलकूल गर्दी नव्हती. म्हणजे विमान खूप उशीरा सुटणार आहे, असे जाहीर केल्यामुळे साडेपाच वाजता आलेली मंडळी इतरत्र पागली की काय, असा श्यामच्या मनात विचार आला. बरे झाले, विमान चांगले चार–पाच तास उशीर असले तर पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणाची सुरुवात छान करता येईल!

तो जवळचा पासपोर्ट व विमानाचे तिकीट दाखवू लागताच कट्ट्यावरच्या माणसाने जे काही सांगितले त्यामुळे श्यामचा चेहराच नव्हे तर माणसामध्ये जे काय पडण्यासारखे असते ते सगळे पडले; 'पण...पण...माझी आजची जागा 'सुरक्षित' केली आहे टॅक्सी नादुरुस्त झाली म्हणून उशीर झाला. कृपा करून काही तरी करा!' श्याम मोठ्या काकुळतीने म्हणाला, 'मान्य आहे तुमचे म्हणणे,' तो विमान–चालकासारखे कपडे घातलेला माणूस खांदे उडवून म्हणाला, 'जागा सपल्या आहेत. मी काय करू?' व वाद सपला हे दाखवण्याच्या हेतूने तेथून जाऊ लागला. एवढ्या मोठ्या भव्य व चकचकोटाच्या इमारतीतही श्यामच्या डोळ्यांसमोर अंधेरी आली. आता काय करायचे? आता प्रवासच नाही तर प्रवासवर्णन कसले? झोपच नाही तर स्वप्ने कोठली? मेव्हणा व राधा दूर उभे राहून पहात होते. काही तरी घोटाळा झाला आहे, हे श्यामच्या चेहऱ्यावरून त्याच्या लक्षात आले; पण त्या परिस्थितीत श्यामशी बोलण्यात अर्थ नव्हता.

आता अगदी शेवटचा प्रयत्न करावयाचा म्हणून श्याम 'मी पहिल्या वर्गाचा पॅसेंजर आहे' असे म्हणाला, पहिल्या वर्गाचा पॅसेंजर आहे, हे ऐकताच तो विमान–चालकासारखे कपडे घातलेला माणूस वळून परत आला व म्हणाला, 'महाराज, पहिल्या वर्गाचा तो कट्टा आहे!'

पहिल्या वर्गाच्या त्या कट्ट्यावर एक खजुरासारखी गोड अरब मुलगी बसली होती. तिच्याजवळ जाऊन त्याने प्रथम विचारले की, काही बैठकी रिकाम्या आहेत का? ती हसून म्हणाली 'रगड!' श्यामने भला मोठा निश्वास टाकला व मोठ्या अभिमानाने राधा व मेव्हण्याकडे पाहिले आणि डोळे मिचकावले. त्याचा अर्थ असा की, काही गडबड झाली होती तरी पण बघा शिताफीने मार्ग काढला की नाही! मेव्हण्याने व राधाने डोळ्यात आदर आणून त्याच्या हुषारीचे कौतुक केले.

मग पुढल्या गोष्टी भराभर होत गेल्या. जास्तीचे वजन अपेक्षेप्रमाणे दडपले गेले, विमानात फुकट पेये मिळतात असे त्याने ऐकले होते ते पक्के करावे म्हणून त्याने त्याबाबत विचारले. तर ती म्हणाली, 'आम्ही नेहमी पेय घेतो; पण सध्या मुसलमान लोकाचे रोझे म्हणजे उपवास चालू आहेत. त्यामुळे विमानात पेय देतील किंवा कसे ते माहीत नाही!' श्याम मनाशी म्हणाला, आमचे नशीबच असे. आम्ही कधी नव्हे ते निघालो तर निघाले मुसलमानाचे उपवास!

कस्टम खात्याच्या लोकानी फारच सौजन्य दाखवले त्याचे म्हणजे श्यामचे सामान तपासले नाही. विमानाने जाणारे सर्व प्रवासी आता ज्याला आपण लॉज म्हणतो व परदेशात 'लूज' म्हणतात त्या मोठ्या दालनात निघून गेले होते. एकदा तिकीट पक्के झाले की, विमान–यात्रेकरूची परिस्थिती मोठी विचित्र होते. तो त्या ठिकाणचा रहात नाही. खरं म्हणजे विमान सुटायला अजून चांगली २०–२५ मिनिटे होती; पण श्यामला केव्हा एकदा लूंजमध्ये जातो असे झाले. तो आत येऊ न दिलेल्या मुलीला व मुलांना व त्यांच्या काकांना शेवटचे भेटायला म्हणून बाहेर गेला. त्यांच्याशी हस्तांदोलन करताना मात्र त्याचा गळा दाटून आला होता. सांभाळून रहा व राधाकडे लक्ष द्या, एवढेच तो म्हणू शकला. तेवढे बोलून तो परत आला. मेव्हणा व राधा काही बाही बोलत उभे होते. आता राधाला किसावे किंवा कसे, ह्याचा श्यामच्या मनात विचारसुद्धा आला नाही खरं तर विमानतळावर चागली सुवर्णसधी होती. आतरराष्ट्रीय विमानतळ असल्यामुळे साहेबांचे किसण्याचे प्रकार येथे वेळोवेळी होत असत; पण श्याम आता त्या मुडमध्ये नव्हता. त्याने मेव्हण्याशी व राधाशी हस्तांदोलन केले व आत निघून गेला.

¤

विमानाच्या प्रवेशद्वाराशी एक गोड मुलगी उभी होती. तिने श्यामचे पहिल्या वर्गाचे प्रवास–पत्र पाहिल्यावर जास्तच गोडपणा

दाखवला व तिच्या डाव्या बाजूला उभ्या असलेल्या तेवढ्याच गोड मुलीकडे वळून ती म्हणाली, 'ह्यांना ह्यांच्या बैठकीकडे घेऊन जा बघू !' त्याप्रमाणे त्या मुलीने श्यामला त्याची ऐसपैस बैठक दाखवली.

आपल्या बैठकीवर बसताच श्यामने इकडे-तिकडे पाहिले. कट्टयावरच्या गोड अरब मुलीने सांगितल्याप्रमाणे विमानात खरोखरच रगड जागा होत्या. खरं म्हणजे सगळे विमान म्हणजे पहिला वर्ग तरी रिकामा होता. त्या ४०–५० बैठकींच्या दालनात धूम्रपान–बंदी असलेल्या भागात एक अरब मुलगी व 'धूम्रपान-परवानगी' असलेल्या भागात श्याम एवढी दोनच माणसे होती. त्यामुळे प्रवासात शेजाऱ्याच्या प्रवाशाबरोबर गप्पा मारून तुम्ही कुठले–आम्ही कुठले, तुमचे आडनाव काय व आडनाव भडसावळे वा पळसुले असे खास नसून अगदी जोशी वा कुलकर्णी वगैरे अ-खास जरी असले तरी 'मग आमच्या नाशिकच्या कलेक्टर कचेरीत एक जोशी वा कुलकर्णी आहेत ते तुमचे कोण ?' वगैरे संवादाला श्यामला मुकावे लागणार होते.

श्याम आपल्या बैठकीजवळ जाऊन उभाच होता. तेव्हढ्यात ती (ह. सु) त्याच्याजवळ येऊन तुमचे जाकीट काढून ठेवू का, म्हणून विचारू लागली. आता कोट न काढता ती एकदम जाकीट काढण्याची परवानगी का मागत होती ते स्पष्ट केले पाहिजे. आपण ज्याला कोट म्हणतो त्याला परदेशात ते लोक 'जॅकिट' म्हणतात व जॅकिटाला काय म्हणतात ते श्यामला माहित नव्हते. नशीब पॅन्टला पॅन्टच म्हणतात ते !

पण कोटाला जॉकिट म्हणोत वा काही म्हणोत त्यात पासपोर्ट, विमानाची प्रवास–पत्रिका, थोडे पैसे वगैरे होते. त्यामुळे कोट वा जॅकीट तिच्या हाती देणे धोक्याचे होते. तेव्हा तिला कशाला, कशाला म्हणून तो पुन: आपल्या बैठकीवर बसला. विमान सुरू व्हायला अजून खूप अवकाश होता. पहिल्या वर्गात जशी रगड जागा होती तशी 'काटकसरी'च्या वर्गात रगड गर्दी होती. तेथे उतारूंची डोके मोजणी चालू होती.

'आपण काय पेय घेणार ?' ह. सु. ने हसतमुखाने विचारले.

'तुमच्याकडे काय काय आहे ?' श्यामने उलट प्रश्न केला. गेल्या एक-दीड महिन्याच्या अभ्यासाने श्याम खूप चलाख बनला होता. आपण काही तरी बिअर वा रम वगैरे म्हणावयाचे व ती वेळ साहेबांच्या मॅनर्सप्रमाणे रम वा बिअर घेण्याची नसावयाची, म्हणजे मग ती हसु फिदी फिदी हसणार; त्यापेक्षा तुमच्याकडे काय आहे असे विचारले म्हणजे हसु त्या वेळी घेण्यास योग्य अशा पेयांचीच नावे सांगणार व त्यातले साधारण विचार करून शेवटचे पेय सांगावयाचे, ह्या हेतूनेच श्यामने तो प्रश्न केला होता हसुने तीन–चार पेयांची नावे सांगितली. श्यामने ठरल्याप्रमाणे शेवटच्या पेयाचे नाव सांगितले 'एका क्षणात आणते मी', म्हणून ती लगबगीने गेली व दोन–तीन क्षणात तिने टुणटुणचासुद्धा हात सहज मावेल अशा सोफासेटच्या हातावर एक गोल कागद ठेवला व त्यावर चकाकणारे पेय असलेला तेवढ्याच चकचकीत चषक आणून ठेवला.

आता हसुने येताच जॅकेट काढून ठेवू का, असे का विचारले ते श्यामच्या लक्षात आले. मुंबईत बाहेर जेवढे उकडते तेवढेच विमानात उकडत होते. हसु पेय घेऊन आल्यावर श्याम तिला म्हणाला, 'तू म्हणत होतीस ते योग्यच होते. हा कोट ठेवून दे !' अर्थात कोट तिच्या हाती देण्याआधी त्याने आतला पासपोर्ट, पैसे व प्रवासपत्रिका शिताफीने काढून ठेवली होती. तिनेही मघाशी विचारले होते त्या वेळी नाही म्हणाला होतात, आता का सांगता आहात, वगैरे कुरकुर न करता, उलट हसत हसत त्याचा कोट घेतला व निघून गेली. ह्या बाईचे विमान संयुक्त महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईला शेकडो वेळा थांबूनसुद्धा तिच्यावर त्याचा काही परिणाम झाला नव्हता, ह्याचा श्यामला खूप आनंद झाला व ह्यापुढे कोठेही प्रवास करावयाचा झाल्यास तो ह्या गल्फ एअरनेच करावयाचा, असे त्याने मनाशी ठरवले.

श्यामचे ते पेय होईपर्यंत विमान पळण्याच्या मुख्य पट्टीवर येऊन योग्य दिशेकडे तोंड करून उभे राहिले होते. आता विमानाने शेवटचा जोर करून धावावयास सुरुवात केली व आकाशात उड्डाण केले. श्यामने घड्याळाकडे पाहिले. आठ वाजून पाच मिनिटे झाली होती. म्हणजे विमान फक्त अर्धा तास उशिरा सुटले होते. म्हणजे लेख लिहिण्याच्या दृष्टीने व अनिश्चितता – रस निर्माण करण्याच्या दृष्टीने काहीच उशीर झाला नव्हता. त्यामुळे रस त्याने तसाच पॅक बंद करून ठेवला.

मग हसु जणू काय हात धुऊन वा हात न धुता त्याच्या मागे लागली. पेय झाल्यावर तिने जेवण व जेवणाआधी फुकट पायात घालावयाचे प्रसिद्ध मोजे व डोळ्यांवर लावावयाची पट्टी – पूर्वी नादिया नावाची नटी 'हंटरवाली' सिनेमात लावावयाची तशी पट्टी – आणून दिली. श्यामने ते पाकीट फोडले; पण राधाला व घरी येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना दाखवायला उपयोगी पडेल म्हणून वापरले मात्र नाही.

जेवताना कोणते पेय घेणार, ह्याबद्दल हसुने विचारले. श्यामने ठरलेली चौकशी करून शेवटचे पेय सांगितले. जेवण झाल्यावर व गोड बशी खाऊन झाल्यावर हसुने शॅम्पेन घेणार का म्हणून विचारले. आता श्यामला किती खाऊ व किती पिऊ असे झाले होते; पण पेय जरी गल्फ नाल्याचे होते तरी पोट आपले होते ना ? व पोटाअर्थीच जगदीश त्याला ओमानसारख्या ठिकाणी नेत होता. तर तेथे जाण्याआधी पोट बिघडून कसे चालले असते ? गाण्यात एक सकेत आहे. डोळ्यानी पाहिले पण हृदयाला जाणवले. तसे खाण्यातही आहे. तोंडाने खाल्ले व पोटाला जाणवले !

¤

मग विमान-प्रवासाचा शेवटचा अंक सुरू झाला. तुम्ही काही वस्तू विकत घेणार का असे हसुने विचारले व छान रंगी – बेरंगी विक्री – पत्रके त्याला आणून दिली. त्यात छान छान सिगारेट पेटवावयाच्या चकमकी होत्या, घड्याळे होती, सुवासिक द्रव्याच्या बाटल्या होत्या. साधारपणे हिंदी लोक, ज्याचा चॅनेल असा उच्चार करतात, त्या शॅनेलच्या बाटल्या घेतात असा हसुचा अनुभव असावा असे वाटते. कारण तिने शॅनेलच्या किती वा कोणती बाटली आणू, असे विचारले. एका बाईने आपल्याला एका बाटलीविषयी असे गृहीत धरावे ह्याचा श्यामला खूप राग आला. तो म्हणाला, 'शॅनेल तर काय नेहमी घेतो.' मग त्याने त्या विक्री – पुस्तकातून 'लि ओनार्ड' ह्या ओळखीच्या नावाच्या बाटलीची निवड केली.

त्या पत्रिकेत किंमती फक्त दिनारमध्ये दिल्या होत्या. श्यामला फक्त डॉलर्स व रुपये ह्यांचा काय संबंध आहे ते माहीत होते व त्या बाईला डॉलर्स व दिनार ह्याचा संबंध माहीत होता. आता रुपयाचा व दिनारचा संबंध कसा काढावयाचा, हे दोघाचेही गणित जेमतेम असल्यामुळे दोघांनाही कळेना. शेवटी काही तरी करून श्यामने पैसे चुकते केले. ह्या व्यवहाराचा एक विशेष की, त्या दोघाना आपला फायदा झाला आहे असे वाटले होते.

आता दीड – दोन तास तरी हृसुचा त्रास नाही. आता झोप घ्यावयाला हरकत नाही म्हणून Time मासिकातल्या जाहिरातीत असते तशी श्यामने समांतर बैठक केली व डोळे मिटले. दोन अर्थानि ही स्थिती त्रिशकू सारखी असते. एक तर तुम्ही अक्षरशः जमीन व आकाश ह्यामध्ये लोंबकळत असता व मनाने तुम्ही जो देश सोडलेत त्याचे नसता व नवीन देशात अजून जावयाचे असल्यामुळे त्या देशाचेही नसता. त्यामुळे घड सोडलेल्या देशाविषयी विचार येत नाहीत, तसेच धरावयाच्या देशाबाबतही काही विचार येत नाहीत. असे विचार करता करता श्यामचा डोळचाला डोळा लागला.

¤

श्यामची झोपमोड झाली तो त्याला वाटले की, विमानात कुठला लाउड–स्पीकर ऐकू येतो आहे बरे, असा प्रश्न त्याला पडला त्या वेळी! खरं म्हणजे तो लाउड-स्पीकर नव्हता. विमानातली कोणी हृसु कोणा फलाण्या कॅप्टनतर्फे व त्याच्या सहकाऱ्यातर्फे सर्व प्रवाशांना धन्यवाद देत होती. आता थोड्याच वेळात तुम्ही मस्कतला पोहोचाल. तुमचा प्रवास सुखाचा झाला असेल, अशी आशाही तिने व्यक्त केली. एवढा पहिल्या वर्गाचा चकटफु प्रवास, त्यातले चकटफु खाणे –पिणे मिळाल्यावर, प्रवास का नाही सुखाचा होणार? योग्य वेळी व योग्य जागी विमान थांबले. मग श्यामने कंबरपट्टा सोडून ठेवला व तो जाण्याकरता उभा राहिला तोच हृसूने त्याचा कोट आणून व घालून दिला. अशा निष्पाप बाईविषयी आपण उगाच संशय घेतला ह्याची त्याला खत वाटली. ही खंत प्रवास-वर्णनात दाखवावयाचीच हे त्याने पक्के केले व तू कोठल्या देशाची, विमान कुठपर्यंत जाणार आहे ह्याची चौकशी करून तो बाहेर पडला.

बाहेर जिन्याच्या पायऱ्यावर येताच त्याला मोठा गरम हवेच्या झळा लागल्या. ह्या देशाला ओमान म्हणावे की, ओव्हन म्हणावे, असे त्याच्या मनात आले ह्याच चालीवर विचार केल्यास प्रवास-वर्णनाच्या पुस्तकाच्या नावाचाही प्रश्न सुटेल, असेही त्याच्या मनात आले. पुस्तकाच्या नावाचा प्रश्न असा सहजरीत्या सुटणार, ह्या कल्पनेनेच त्याला त्या ओव्हनरूपी ओमानमध्येसुद्धा थंड थंड वाटू लागले.

बाकी प्रवाशावरोबर श्याम चालत चालत मुख्य इमारतीत आला व सामान येण्याची वाट पाहू लागला. तेवढ्यात अरब लोक घालतात तसा लांब पांढरा झगा घातलेला पण डोक्याला पांढरे फडके नसलेला व काळा गोफ नसलेला नुसता रंगीत टॉवेल गुंडाळलेला एक काळा, उंच माणूस त्याच्याकडे आला व श्यामशी हस्तांदोलन करून म्हणाला, 'मेरा नाम हबीब है, आप फलाणे साहब है ना? आपने जो फोटो भेजा था उसमें चष्मा नही है. इसलिये पहचाननेमे तकलिब हुई और थोडा टाइम लगा. माफ करना!' श्यामच्या मनात इथले लोक पण आपल्या–सारखेच चुकीचे हिंदी–उर्दू बोलतात की, असे आले.

हबीबला हिंदी–उर्दू बोलता येत असल्याने भाषेचा प्रश्न व त्यामुळे होणाऱ्या अडचणीचा प्रश्न मिटला होता. त्याचा आनंद मानावा की कसे ते श्यामला कळेना. कारण त्यामुळे भाषेची अडचण जशी येणार नव्हती तसेच श्यामचे पुस्तक 'परदेशातल्या अडचणी–भाषेमुळे येणाऱ्या,' ह्या प्रकरणाला चक्क मुकणार होते.

सरकारी कामाकरता श्याम आला असल्याकारणाने कस्टम वगैरेचा काहीही त्रास न होता दहा–बारा मिनिटांत तो बाहेर पडला व हबीबबरोबर एका भल्या थोरल्या आयाती–गाडीत बसला. हबीब उर्दूइतकेच इंग्रजीही चांगलेच चुकीचे बोलत होता. त्यामुळे श्यामला अगदी घरच्यासारखे वाटले.

पुढल्या काही दिवसांत श्यामवर असे घरच्यासारखे वाटण्याचे प्रसंग वारंवार येऊ लागले. त्यामुळे तो त्याच्या भावी पुस्तकाच्या बाबतीत उदास होऊ लागला होता.

त्यांची ती भली मोठी गाडी एका दुमजली हॉटेलसमोर येऊन उभी राहिली. श्याम बाहेर येऊन हॉटेलकडे निरखून पाहू लागला. हबीबला वाटले की, ह्या हिंदी माणसाला हे हॉटेल खूप आवडले आहे. खरे म्हणजे श्यामला ते हॉटेल किती ताऱ्यांचे आहे ते पहावयाचे होते. त्याने फाइव्ह–स्टार हॉटेल, थ्री स्टार हॉटेल वगैरे ऐकले होते. सरकारी नोकरीमुळे तो नेहमी एकटा-बंगल्यात वगैरे उतरावयाचा. हॉटेलचा त्याला अनुभव नव्हता. त्याला फाइव्ह स्टार हॉटेल म्हणजे इमारतीवर पाच लखलखणारे तारे असतील असे भोळेपणाने वाटले. मग हॉटेलवर तर एकही तारा दिसेना. बिन-तारेच्या रेडिओप्रमाणे बिन-ताऱ्याची हॉटेलं पण निघाली आहेत की, काय, असा त्याला प्रश्न पडला; पण हा प्रश्न हबीबला न विचारण्याचा चाणाक्षपणा श्यामने दाखवला व पुस्तक लिहिण्याआधी कोणाला तरी विचारू, म्हणून तो हबीब व सामानाच्या मागोमाग हॉटेलच्या इमारतीत गेला.

हॉटेलच्या कट्ट्यावर काळा कोट घातलेला एक माणूस दुसऱ्या काळ्या कोटवाल्या माणसाशी चक्क गोव्याच्या भाषेत बोलत होता! हबीबने त्याला श्यामबद्दलचा सरकारी खलिता दाखवला. त्या पहिल्या काळ्या कोटाने श्यामकडे पासपोर्ट मागितला व त्यावरून त्याच्या भल्या मोठ्या वहीत नोंद केली व पासपोर्ट परत देताना म्हणाला, 'तुमच्याच मंत्रालयात हिंदुस्थानचा एक सरदारजी चार दिवसांपूर्वी आला आहे. तो आता बाहेर गेला आहे. आता एवढ्यात येईलच.'

तो एवढे म्हणतो आहे तोपर्यंत एक जाडा गिड्डा, दाढी असलेला सरदार, सरदारजी पद्धतीने डुलत डुलत त्याच्याकडे येताना दिसला. श्याम म्हणाला, आपल्या भावी पुस्तकात हे जाडे पात्र टाकायला हरकत नाही. पुस्तक चागले जाड होईल व शिखाबद्दल, त्यांच्या संस्कृतीबद्दल परिचय करून देता येईल.

त्या डुलत डुलत येणाऱ्या सरदारजीने श्यामच्या हातात हात मिळवत व श्यामच्या 'सत् श्री अकाल 'ला ' तुम्ही कुठल्या गावचे ' असा खड्या मराठीत सवाल केला. हा सरदारजी नावाचाच सरदार होता. त्याचा स्वतःचा जन्म, शिक्षण, लग्न, मुलं, सगळं

मुंबईला बांद्र्याला झाले होते. गेली ४५-४६ वर्षे तो तेथे होता. म्हणजे श्यामपेक्षा तोच जास्त मराठी होता. म्हणजे सरदार संस्कृती-बद्दल जवळून–म्हणजे फार जवळून नाही, कारण सरदाराच्या फार जवळ जाणे शक्य व हितावह नसते; पण साधारण जवळून-अभ्यास करण्याची संधी श्याम हुकला होता.

कट्ट्यावरच्या त्या गोव्याच्या माणसाने श्यामच्या ध्यानावरून व नावावरून तो कोण-कुठला ह्याचा अंदाज केला होताच. त्याने एका हिरवा गणवेष घातलेल्या सहाय्यकाला श्यामचे सामान फलाण्या खोलीत ठेव, म्हणून सागितले व श्यामला त्याच्याबरोबर जा, म्हणून सल्ला दिला. तेव्हढ्यात तो सरदारजी श्यामला म्हणाला, 'तुम्ही कपडे वगैरे बदलून या. मग फुकटच्या जेवणावर ताव मारू या!' म्हणजे हा सरदारजी नुसता भाषेनेच नव्हे तर वृत्तीनेही अगदी मराठी झाला होता. 'फुकट' शब्दाची चव त्यालाही जाणवली होती म्हणायची!

सरदारजीने फुकट जेवणावर ताव मारू या, म्हणण्यामागे सबळ कारण होते. साधारण-पणे कोणतेही सरकार रहाण्याचा खर्च करते. खाण्या–पिण्याचा खर्च प्रत्येकाने आपआपला करावयाचा असतो; पण इथले सरकार मोठे कनवाळू असल्याकारणाने ते रहाण्याचा व खाण्याचा सगळा खर्च देणार होते. पिण्याचा खर्च म्हणजे पक्क्या पेयांचा खर्च देणार नव्हते; पण कोकाकोला वगैरेचा खर्च देणार होते. जेवण-खाण व रहाणं फुकट म्हटल्यावर मग एकारान्त 'स्थ' माणसाला आणखी काय पाहिजे? ह्या फुकटपणाच्या भावनेत त्याने पत्र पण फुकट पाठवता येतील का, अशी चौकशी केली व त्याचे नकारार्थी उत्तर आले तरी त्याची पर्वा न करता राधाला सुखरूप पोहोचल्याची आनंदाची बातमी व त्यापेक्षा आनंदाची बातमी म्हणजे, किती तरी स्टार्स असलेल्या हॉटेलमध्ये रहाणे व खाणे फुकट असल्याचे कळवले.

हे फुकट खाण्या–राहण्याचे राधाला कळवले; पण मग मात्र त्याला मोठी रुखरुख लागली. काही गोष्टी फुकट मिळणार आहेत कळल्यावरच्या आनंदात राधा काय करते, हे त्याने त्याच्या निवडीच्या पत्रातली फुकटची यादी वाचून दाखवली होती त्या वेळी अनुभवले होते. आता हे 'फुकट'चे पत्र पोहोचेल व राधा वाचेल त्या वेळी तिच्याजवळ कोणी लुच्च्या माणूस नसला म्हणजे मिळवली, असे त्याच्या मनात आले.

मग श्याम कपडे वगैरे बदलून बारमध्ये आला. तेथे सरदारजी त्याची वाट पाहात होताच. मग ते इकडच्या–तिकडच्या गप्पा मारत बिअर प्यायले व जेवायला उठणार, तेवढ्यात वेटरने त्याला बिल आणून दिले. बिल बघताच श्यामचा जीव व्याकुळला. कारण त्याने आपल्याकडच्या दोन बाटल्यांइतकी बिअर घेतली होती तरी त्याला ५२ रुपये पडले होते! सरदारजीने रम लीघेत होती; त्याच्या एका पेगाला २५ रुपये पडणार होते व त्यात मिसळण्याकरता कोला घेतला होता तर त्याला आठ रुपये पडणार होते.

हा बिअरच्या किंमतीचा पॉइंट आपल्या पुस्तकात करण्याचे श्यामने नक्की केले. प्रथम त्याला अशा किंमती प्रवास-वर्णनात देणे मंजूर नव्हते. तो म्हणायचा, अशी महागाई असते म्हणून तर यजमान–सरकार तुम्हाला पाच आकडी पगार देत असते. तर प्रत्येक वेळी हॉटेलला दर दिवसाला ५०० रुपये पडले, चहाला १२ रुपये पडले वगैरे देण्यात काय हशील आहे?

श्याम बिअर व रमच्या किंमतीनी इतका हबकून गेला होता की, हॉटेलमधले जेवण फुकट असूनसुद्धा त्याचे मन जेवणाचे करेना. तेव्हा तो न जेवता आपल्या खोलीत गेला. दिवसभराचा परदेशी प्रवासाचा शीण व चांगली बिअर ह्यामुळे त्याला चांगली गाढ झोप लागली ती चांगली सकाळी सातपर्यंत म्हणजे आपल्याकडल्या साडेआठ वाजेपर्यंत! ¤

श्याम आघोळ करून व कपडे करून तयार झाला. त्याला न्यायला येणारा माणूस अजून आला नव्हता तोपर्यंत त्याने टेबलावर पडलेले वाङ्मय वाचावयाला सुरुवात केली. एका पत्रिकेवर ओमानच्या नाण्याबद्दल माहिती दिली होती. एक रियाल म्हणजे १००० बैसा वगैरे. प्रथम श्यामला 'बैसा' ह्या शब्दाच्या इंग्रजीतल्या स्पेलिंगचा उच्चार करता येईना. Baises असे काही तरी होते. कोणताही नवा उच्चार आपल्याला माहीत असलेल्या उच्चाराशी जोडून पहावा व लक्षात ठेवावा म्हणजे तो लवकर लक्षात रहातो, असे श्यामने कुठे तरी वाचले होते. १००० बैसा म्हणजे १ रियाला १००० बैसा म्हणजे १ रियाल, असे मनाशी म्हणता म्हणता त्याला कल्पना सुचली. ती म्हणजे, बैसा हा पैसा ह्या शब्दावरून लक्षात ठेवावा. आपण केवढा मोठा प्रश्न चुटकी-सरशी सोडवला ह्याचा श्यामला आनंद झाला; पण तो आनंद एक–दोन दिवसांतच मावळला. कारण त्याने बैसा हा शब्द पैसा-वरून लक्षात ठेवण्याची शक्कल काढली ही शक्कल नसून खरोखरीच तशी स्थिती होती. बैसा हा पैसा ह्या शब्दावरूनच आलेला शब्द आहे म्हणे! कारण अरबी भाषेत 'प' हे अक्षरच नाही! त्याऐवजी 'ब' अक्षर वापरतात व मूळ शब्द पैसा व अरबी भाषेत त्याला बैसा म्हणतात श्यामला इतर कित्येक अरबी भाषेतील सुरस गोष्टी-पेक्षा ही गोष्ट जास्त सुरस वाटली.

साधारण ९॥ वाजता हॉटेलच्या स्वागत करणाऱ्या माणसाने श्यामला तुम्हाला कोणी तरी घ्यावयास आला आहे, म्हणून सांगितले. तशी श्याम स्वागत–कक्षात येऊन दाखल झाला. तेथे कालच्या हवीबसारखा पण जास्त काळा लाब अरबी झगा घातलेला माणूस त्याला दिसला. त्यानेही डोक्याला रंगीत टॉवेल वा शाल असते तसे रंगीत विणकाम केलेले फडके बाधले होते. श्यामने आता चष्मा घातला नसल्याकारणाने त्याने श्यामला चटकन ओळखले व श्यामला बघताच तो उठून दाराबाहेर पडून चालू लागला श्याम त्याच्यामागोमाग बाहेर पडला. श्यामची कल्पना अशी की, बाहेर त्याच्या-करता कालच्यासारखी एखादी 'लिमॉसाइन' गाडी उभी असेल. तश्या गाड्या पुष्कळ होत्या; पण तो ओमानी माणूस त्या गाड्या तशाच टाकून पुढे जाऊ लागला.

बाहेर अतिशय गरम होते. जसे अरबी भाषेत 'प' ऐवजी 'ब' म्हणतात त्याप्रमाणे 'व्ह' ऐवजी 'मा' म्हणत असतील, म्हणजे ओव्हनऐवजी ओमान म्हणत असतील असा कालचा शिळा विचार परत गरम करून श्याम पुढे चालू लागला.

पण तो ओमानी माणूस ओव्हनची पर्वा न करता तसाच पुढे चालू लागला होता. आता त्या माणसाला हाक मारून असेच कचेरीपर्यंत पायी जायचे की काय, असे उर्दूमध्ये विचारावे की इंग्रजीत विचारावे, असा श्यामला प्रश्न पडला; पण आपण

इंग्रजीचे इतके गुलाम झालो आहोत की कोणत्याही अडी-अडचणीला आपल्या तोंडातून इंग्रजी भाषाच बाहेर पडते. त्या वृत्तीनुसार श्याम त्या माणसाला इंग्रजीत विचारता झाला. 'But where is the car?' व मग त्याचे त्यालाच कसेसेच वाटले. सगळ्याना सर्रास इंग्रजी यायला ओमानी लोक इंग्रजाचे गुलाम थोडेच होते आपल्यासारखे? पण आनंदाची गोष्ट म्हणजे, इंग्रजांचा गुलाम नसूनसुद्धा त्या माणसाला श्यामचा प्रश्न कळला. एवढेच नव्हे तर त्याने 'car? for what? office is just on the other side of the road.' म्हणून इग्रजीत उत्तरही दिले व तो पुढे चालायलाही लागला.

मग कचेरीत जाऊन श्यामने मुख्य-अधिकाऱ्याची भेट घेतली. त्यांनाही उत्तम इग्लिश येत होते. त्यांनी आपल्या सहाय्यकाला बोलावून श्यामला त्याच्या युनिटमध्ये नेण्यास सांगितले. श्यामच्या युनिटमध्ये पाच-सहा लोक होते. एक ब्रिटीश, दोन पाकिस्तानी, एक सिलोनी व दोन इजिप्तचे! आता त्यात श्याम हा भारतीय सामील झाला होता. सिलोन, हिंदुस्थान, इजिप्त व पाकिस्तान हे देश ब्रिटिश वर्चस्वाखाली पुष्कळ वर्षे होते. त्यामुळे हे पाच लोक पाच देशाचे असूनही त्याची भाषा इंग्रजी होती. म्हणजे आता येथे भाषेची अडचण होण्याचा काहीही संभव नव्हता. तेव्हा आपल्या भावी पुस्तकातून भाषेमुळे होणारे गोघळ, अडचणी व विनोद हे प्रकरण श्यामला कायमचे गाळावे लागणार होते.

पहिला दिवस असल्यामुळे त्याला काम नव्हतेच. मग सहकाऱ्यात तुम्ही कुठले, आम्ही कुठले वगैरे चर्चा झाली. दोघा पाकिस्तान्याला एक ओमानला गेली सात-आठ वर्षे होता. श्यामचे आडनाव ऐकताच त्याने श्यामच्या आडनावाचा आणखी एक भारतीय येथे आहे, असे सांगितले. श्यामने त्या आडनावबंधूचा पत्ता व दूरध्वनीक्रमांक लिहून घेतला. आपण येथे येण्याआधी येथे किती मराठी लोक असतील ह्याचा विचार करत होतो, तर आपल्याच आडनावाचा एक आहे हे कळून श्यामला अचंबा वाटला.

एक वाजता कचेरी सुटली. हॉटेल कचेरीच्या अगदी समोर म्हणजे मोजून शंभर पावले होते. मुसलमान लोकांचे उपवास असल्याकारणाने काही खाणे तर सोडाच, पण साधे चहा पिणे पण श्यामला शक्य झाले नव्हते. पोटात भुकेची आग पेटली होती व वर ऊन 'आना' म्हणत होते. महाराष्ट्रात ऊन 'मी' म्हणते हे सर्वांस माहीत आहेच. इथली भाषा अरबी असल्यामुळे व मराठी 'मी' ला अरबी 'आना' प्रतिशब्द असल्यामुळे इथल्या उन्हाने 'मी' म्हणण्याऐवजी 'आना' म्हणणे सहाजिकच होते.

श्याम जेमतेम हॉटेलपर्यंत पोहोचला त्या शंभर पावलात आपण मूर्छा येऊन पडतो की काय, असे त्याला झाले होते. हॉटेलच्या दाराशी येताच त्याला एका सरदारजी दारवानाने दार उघडले. स्वागत-कक्षात जाताच श्यामला खूप थंड थंड वाटले व त्याच्या जिवात जीव आला. खोलीत जाऊन कपडे बदलून तो बारमध्ये गेला व २५ रुपये किंमत असलेली बिअर प्यायला व मग जेवणाच्या खोलीत गेला. तेथला मुख्य वाढपी व इतर सहाय्यक वाढपी गोव्याचे होते. त्या मुख्य वाढप्याने श्याम भारतीय आहे की पाकिस्तानी आहे, ही माहिती शिताफीने काढून घेतली व भारतीय आहे हे कळल्यावर तो मोठ्या अघळपघळतेने बोलू लागला.

गोव्याच्याच एका सहाय्यक वाढप्याने मेनू-कार्ड म्हणजे एक फसवा-फसवीचा परवाना आहे, ह्याची श्यामला कल्पना दिली. साध्या साध्या गोष्टीना अवघड फ्रेंच नावें देण्यात व लोकाची दिशाभूल करण्यात लोकांना काय मजा वाटते हे त्याला कळेना. आता साधे 'मुलीगाटावनी सूप' हे नाव पहा. खरे म्हणजे आपल्या पातळ भाजीपेक्षा पातळ असते ते द्रव्य म्हणजे 'मुलीगाटावनो सूप.' मग त्याला एवढे बडे नाव का व त्याला एवढे बडे पैसे का? अशा जेवणाला जवळजवळ ९० रुपये पडत होते. यजमान सरकार जेवणाचे पैसे देणार असल्याकारणाने श्यामला ९० रुपये पडले काय व १०० पडले काय, काही फरक पडणार नव्हता; पण त्या किंमतीमुळे श्यामला काल रात्री हॉटेल किती तारांकित आहे, म्हणजे किती स्टार्सचे आहे हे ठरवण्याचा सोपा मार्ग कळला. तो सोपा मार्ग म्हणजे जेवण झाल्यावर व बिल पाहून तुमच्या डोळ्यासमोर पाच तारे चमकले तर फाइव्ह स्टार हॉटेल व तीन तारे चमकले तर ३री स्टार हॉटेल! वा, काय सुबोध मार्ग सापडला होता!

जेवून श्याम खोलीत आला. बाहेर ऊन अजून 'आना'च म्हणत होते. बरं बाहेर जावे, भेटावे तर कोणी ओळखीचे पण नव्हते. त्याच्या आडनावबंधुची कचेरी परत चार वाजता सुरू होणार होती. हो ते सांगावयाचे राहिलेच ओमानमधल्या सरकारी कचेऱ्या सकाळी साडेसात ते दोन व उपासाच्या दिवसात ८॥ ते १ असतात व खाजगी कचेऱ्या सकाळी ८ ते १ व दुपारी ४ ते ७ पर्यंत असतात त्यामुळे चार वाजण्याच्याआधी आडनाव बधूना दूरध्वनी करणे पण शक्य नव्हते. तेव्हा थोडा वेळ वामकुक्षी करावी ह्या हेतूने तो लवंडला. खोली वातानुकूलित असल्याने गोड झोप लागली व जाग आली त्या वेळी सात वाजले होते! आडनावबंधूला फोन करावा म्हणून त्याने दूरध्वनीचालकाला हवा तो क्रमांक सांगितला.

मुंबईहून निघताना त्याने राधाच्या सल्ल्याने ओमानला गेल्यावर कोणा हिंदी माणसाशी काहीही संबंध ठेवावयाचा नाही, असे ठरवले होते. मराठी माणसांशी तर बिलकूल नाही. कारण मग आपण परदेशात Mini-India वा Mini-Maharashtra निर्माण करतो व लोकल लोकांशी काही संबंध येऊ देत नाही. त्यांच्या भाषेबद्दल व संस्कृतीबद्दल काही माहिती होत नाही वगैरे वगैरे. पण काय नवल पहा, मुंबई सोडून अवघे चोवीस तासही झाले नव्हते, तोच त्याला मराठी व अगदी आपल्या आडनावबंधूची भेट घेण्याची ओढ वाटू लागली होती.

दूरध्वनी लागेपर्यंत त्याने चहा मागवला व त्याबरोबर दोन सफरचंदे पण मागवली. डाळिंबासाठी मस्कत एवढे प्रसिद्ध असूनही हे हॉटेल डाळिंब मात्र पुरवत नव्हते. ह्याचे त्याला आश्चर्य वाटले, चहा व सफरचंद आले. चहाला ८॥ रुपये व सफरचंदाला पण ८॥ रुपये पडणार होते. म्हणजे सरकारला पडणार होते. चहाचा ट्रे ठेवून तो पोरगा गेला. चहा बनवता बनवता श्याम मनातल्या मनात हसला व म्हणाला, 'चंगळ आहे काय भटजी बुवा तुमची. ८॥ रुपयाचा चहा व ८॥ रुपयाची सफरचंदे!'

तेवढ्यात आडनावबांधवाचा दूरध्वनी लागला. श्यामने आपले नाव, गाव व आपण

कोणत्या कामाकरता आलो आहोत ते त्या बंधूला मोठ्या उत्साहाने सांगितले. पण त्या बधूला श्यामला वाटले होते तेवढे एकच आडनावपणाचे विशेष कौतुक वाटलेले दिसले नाही. तो थंडपणे म्हणाला 'आपल्या आडनावाचे चागले चार-पाच लोक आहेत इथे. गेल्या महिन्यात इथल्या लोकांनी मराठी नाटक पण बसवले होते.' थोडक्यात म्हणजे मराठी नाटक बसवण्याइतके व ते पहावयास येण्याइतके मराठी लोक येथे आहेत त्यामुळे तुम्ही येण्याचे फार मोठे कौतुक नाही व शेवटी 'या कधी तरी' असे तो बंधू थंडपणे म्हणाला. त्याचा थडपणा बघून श्यामला थोडे गरम वाटू लागले होते.

पण येत्या दोन–चार दिवसात आणखी दोन-चार मराठी माणसाचा त्याला हाच अनुभव आला. इतक्या गरमाईत ही मराठी माणसे आपला थडपणा बाळगून आहेत ह्याचे श्यामला मनापासून कौतुक वाटले.

¤

असेच दिवस चालले होते. संध्याकाळी झोपून उठून बाजारात फिरायला म्हणून बाहेर पडावे तर तिथले सगळे सामान, वस्तू व विक्रेते आपले आयात केलेले! म्हणजे जपान, फ्रान्स, इग्लड वगैरे ठिकाणचे व विक्रेते भारत व पाकिस्तानमधून आयात केलेले! ओमानी सामान वा ओमानी दुकानदार अगदी औषधालाही दिसला नाही. शुक्रवारी सुट्टी असल्यामुळे तर बाजारात भारतीयाच्या व तत्सम लोकाच्या झुडीच्या झुडी दिसत. सगळे आपले पैसे कमवायला आलेले! बाप्ये! क्वचित काही केरळ्यासारखी दिसणारी जोडपी दिसत. बाकी सगळे आपले बाप्ये!

ह्या पुरुष वर्गाचा जुडगाच्या जुडगा पाहून श्यामला मुबईच्या भय्येलोकाचा आठवण आली. ते भय्ये लोक जसे आपली बायकामुलं उत्तर प्रदेशात वा बिहारमध्ये ठेवून मुबईला जास्तीतजास्त पैसे मिळवायला येतात व मुबईत कमीतकमी खर्च करून घरी जास्तीत जास्त पैसे पाठवतात त्याचप्रमाणे येथे आलेले लोक. फरक एवढाच की, येथे येणारे लोक डॉक्टर्स, इजिनिअर्स वा आर्किटेक्टस् वगैरे वरच्या थरावरचे असल्यामुळे त्याना पैसेही वरच्या थराचे मिळत, पण त्याची वृत्ती मात्र मुबईच्या भय्येलोकाचीच! जास्तीत जास्त पैसा मिळवावयाचा कमीत–कमी खर्च करावयाचा व जास्तीतजास्त भारतात घरी पाठवावयाचा!

येथल्या बहुतेक 'भय्ये' लोकांच्या गाड्या आहेत. त्यामुळे साधारण तरुण जोडपे एखादे लहान मूल, व एखादा 'पोट' भाडेकरू ठेवलेला व ते सगळे गाडीतून खरेदीला चालले आहेत असे चित्र अगदी सर्वसामान्यपणे दिसले.

येथे Indian-club आहे असे कळल्यावर श्यामने जो कोणी बगाली, पंजाबी, मराठी, कानडी भेटेल त्याला Indian-club बद्दल विचारावयास सुरुवात केली. बहुतेकानी हा खुळा असा काय खुळा प्रश्न करतो आहे, असा चेहरा केला. आपण India-club हा शब्दच कधी ऐकला नाही आहे असे बहुतेकानी दाखवले, काहीनी तसाच चेहरा करून आहे कुठे तरी दारसत नावाच्या भागात, असे सागितले व वर असे जोडले की 'आपण त्या भागात जात नाही बुवा कधी. एक तर वेळही नाही व 'त्या' लोकात मिसळावयाची इच्छाही नाही!' सगळ्यांना जणू काही Indian-club माहित असणे व तेथे जात असणे अगदी कमीपणाचे वाटत असावे.

जसा मराठी लोकानी आपला बाणा सोडला नव्हता तसा बाकी भारतीयानी पण आपला बाणा सोडला नव्हता, हे बघून श्यामच्या आधीच्या कौतुकात भर पडली.

श्यामला ह्याचा वचपा काढावयाची सधी थोडे दिवसातच चालून आली. श्याम आल्यानतर सात–आठ दिवसानी त्याच्या मंत्रालयातच कोणी एक बगाली बाबू आला. तो प्रथमच परदेशात आला असल्यामुळे श्यामसारखाच उत्साही होता. श्यामही आपल्यासारखा नुकताच आला आहे हे त्याला कळल्यावर त्याने मोठ्या उत्साहात फोन केला व मी बगाली असलो तरी सगळे आयुष्य मुबईलाच काढले आहे व मला मराठी चागले यते वगैरे सागू लागला, पण श्याम आपला थडपणे हं, ह, करत म्हणाला, 'मुबईला स्थायिक झालेले बागली येथे पुष्कळ आहेत, भेटू या कधी तरी. आपल्या आडनावबंधूचीच वाक्य आपण त्या बंगाल्याला परस्पर देऊन टाकली, ह्याचे श्यामला सात्विक समाधान वाटले.

पुढे श्यामला कोणी रस्त्यात भेटून विचारले की Indian club कुठे आहे? तर प्रथम श्याम त्याला Indian-club की Air India? असा प्रश्न करत असे. त्या माणसाने Indian–club म्हणून परत सागितले की, 'हाँ, हाँ, हिंदी लोकाचा क्लब होय? म्हणतात बुवा कुठे तरी दरसेत नावाच्या भागात आहे म्हणून; पण आपल्याला तेथे जायला वेळ पण नाही व त्या लोकात मिसळण्याची उत्सुकता पण नाही!' मग त्या माणसाचा पडलेला चेहरा बघून श्यामला खूप आनंद व्हावयाचा.

पण Indian–club वरच्या प्रश्नाना हिंदी वृत्तीची उत्तरे देऊन त्या माणसाचा चेहरा पाडता आला असला तरी पुस्तक पाडण्याच्या दृष्टीने त्याचा काही उपयोग नव्हता. आतापर्यंत त्याच्याकडे जी माहिती गोळा झाली होती त्यावर जास्तीत जास्त एखादे प्रकरण झाले असते. आता काय करावे, असा श्यामला प्रश्न पडला. अवघड म्हणून समजली जाणारी गोष्ट म्हणजे परदेशाला जाण्याची. ती चुटकीसरशी सुटली होती; पण अगदी साध्यातली साधी गोष्ट म्हणजे विनोदी प्रवासवर्णन लिहिण्याची, ती होता होत नव्हती. त्याबाबत श्यामची चुटकीच वाजत नव्हती. हात ओले असले म्हणजे जशी चुटकी वाजत नाही तसे ओमानच्या जीवघेण्या उकाड्यात हात कोरडे ठणठणीत असूनसुद्धा श्यामची चुटकी वाजत नव्हती.

¤

ओमानी लोकाच्या सास्कृतिक जीवनाचा परिचय करून घ्यावा म्हणावे तर येथे तसे काहीही कार्यक्रम होत असल्याचे येथल्या वर्तमानपत्रावरून वाटत नव्हते. सगळ्या आपल्या भारतीय वा इंग्रजी व फार तर पाकिस्तानी सिनेमाच्या जाहिराती! मजेची गोष्ट म्हणजे, नवे हिंदी चित्रपट मुबईला लागण्याआधी येथे लागत. खरे म्हणजे, मुबईपेक्षा श्यामने येथेच हिंदी चित्रपट जास्त पाहिले व हिंदी जीवनाचा त्याला जास्त जवळून अभ्यास करता आला. अर्थात येथे अशा अभ्यासाच्या एका बैठकीला जवळजवळ २० ते २५ रुपये पडत. थोडक्यात म्हणजे ओमानी संस्कृतीबद्दलचे प्रकरण त्याला भावी पुस्तकातून, पुस्तकात घालण्याआधीच बाद करावे लागले.

ओमानी लोकांच्या जेवणा–खाण्याबद्दल व त्याच्या पद्धतीबद्दल थोडे टीकात्मक लिहून *आपले जेवणा–खाण्याचे कसे हाल झाले वगैरे* रंगवण्याचा व तसे रंगीत प्रकरण पुस्तकात घालण्याचा श्यामचा विचार होता व त्याच दृष्टीने तो चौकशी करू लागला येथे हिंदी पद्धतीचे काय काय मिळते ह्याऐवजी काय काय मिळत नाही अशीच चौकशी करणे योग्य होईल असे त्याला आढळून आले. कारण येथे सगळे मिळत होते. येथे मुळी दादरच्या रानडे रोडवरच्या बेडेकराच्या दुकानासारखे ठणठणीत दुकानच होते मुळी ! अगदी लोणच्या-मसाल्यापासून पोळपाट-लाटण्यापर्यंत ! फरक अर्थातच किंमतीत व अगदी पोळपाट-लाटणेसुद्धा प्लॅस्टिकच्या पिशवीतून !

भाज्यासुद्धा अगदी सगळ्या मिळत होत्या. कांदे, बटाटे, भेंड्या, सिमला मिरची, कारली, अगदी कोथिंबीरसुद्धा मिळत असे. आता आबट चुका मिळत होता की नाही हे सांगणे श्यामला अवघड होते. कदाचित असेल, कदाचित नसेलही. कदाचित म्हणण्याचे कारण एवढेच की, श्यामला आबट चुका म्हणजे कोणता ते ओळखता आले नसते.

मुंबईत पालेभाजी आणण्याची त्याची एक पद्धत होती. समजा, राधाने त्याला मेथी आणायला सांगितली असली की तो ते नाव लक्षात ठेवत असे व दुकानात जाऊन दुकानदारालाच 'मेथी आहे का हो?' विचारत असे. चेहेऱ्यावर आश्चर्य दाखवून दुकानदार समोरच पडलेल्या मोठ्या ढिगाकडे हात करून म्हणत असे. 'ही काय पडलीय !' मग श्याम राधाने सांगितल्याप्रमाणे घासाघीस करून मेथी घेत असे.

मस्कतला एका दुकानात त्याने असाच कोणत्या तरी पालेभाजीचा ढीग पाहिला. श्यामला वाटले होते की, तो बहुधा आबट चुका असावा. म्हणून त्याने जवळच उभ्या असलेल्या केरळीय माणसाला ही कोणती भाजी, म्हणून विचारले. त्याने काही तरी 'अडू-रेन्डू' म्हणून सांगितले. आता 'अडू रेन्डू' म्हणजे आबट चुका, गोड चुका की घोडचुका ?' असा श्यामला प्रश्न पडला. तेव्हा त्याने तो अडू-रेन्डू पाला घेण्याची चूक केली नाही. जेवण्या-खाण्याबाबत झालेले हाल ते एवढेच ! त्यावर चुकूनसुद्धा विनोदी लेख लिहिणे शक्य नव्हते.

बाहेर खाण्याबाबत काही हाल होतील अशी त्याला आशा होती. पण तिथे पंजाबी हॉटेलं तर अगदी डझानानी होती. तीन-चार मद्राश्यांची होती, गुजराथ्याची चांगली तीन हॉटेल्स् होती. मराठी लोकाची हॉटेलं महाराष्ट्रातच नसतात, तर तिथे असण्याचा काही प्रश्नच नव्हता.

अगदी सगळ्या तऱ्हेचा डोसा, साधा, मसाला, कांद्याचा, सगळ्या तऱ्हेचे वडे व उत्तप्पा असे नाजूक नाव असलेला, पण दिसण्यात जाडयाभरड्या थालीपिठासारखा पदार्थही येथे मिळत असे. गुजराथी हॉटेलात गुलाबजाम, बासुंदी, श्रीखंड मिळावयाचे, किंमती अर्थातच चढ्या.

एवंच, ओमानमध्ये वर्षोनवर्षं पाऊस पडत नसतानाही श्यामच्या पुस्तक लिहिण्याचा कल्पनेवर पाणी पडत चालले होते आता राधा काय म्हणेल, मी तिला कसे तोंड दाखवू, तिने आता सगळ्यांना 'आमचे हे पुलसारखे किंबहुना त्याच्याहून जास्त विनोदी प्रवासवर्णन लिहिणार आहेत', असे मोठ्या फुशारकीने सांगितले असेल आता ती आपल्या मित्र-मंडळींना व माहेरच्या लोकांना कसे तोंड दाखवेल ह्याचीच त्याला पुस्तकापेक्षा जास्त चिंता वाटू लागली होती. पण त्याने अजून धीर सोडला नव्हता.

आणि असा धीर न सोडण्याच्या स्थितीतच त्याच्या उटावर शेवटली काडी पडली. न्हावी हा समाजाचे थर्मामिटर समजायला हरकत नसावी. त्या समाजाबद्दल श्यामच्या मनात लहानपणापासून थोडी भीती होती ती समाजाची राजकीय, सामाजिक आर्थिक घडामोडी व कौटुंबिक भानगडी मोजावयाची पट्टी आहे, असाही त्याचा विश्वास होता. आतापर्यंत त्या समाजाच्या प्रतिनिधीशी आलेल्या संबंधावरून त्याचे त्या समाजाविषयी फार चांगले मत झाले होते. ते प्रेमळ, चाणाक्ष, हुजरजबाबी व बहुश्रुत असतात असाही त्याचा समज होता. त्यातल्या त्याच्या मणिपूरच्या प्रतिनिधीने तर श्यामच्या मनावर कायमची छाप टाकली होती.

इम्फाळ-मणिपूर हे गाव तसे लहान व मोठ्या बाजारात केशकर्तनालये असली तरी काही केश-कर्तक घरी जाऊन कर्तन करत. श्यामचा साधारण महिन्या-दीड महिन्याने एका रविवारी चागला तासा-दीड तासाचा कर्तनाचा कार्यक्रम होत असे.

हा बिहारी न्हावी मणिपूरच्या राजापासून तो थेट तेथल्या जेलमधल्या रंकापर्यंत सगळ्यांचे केशकर्तन करत असे. राजाकडे त्याला दररोज सकाळी सात वाजता दाढी करण्याकरता जावयाला लागत असे. राजाचे सात म्हणजे अगदी सात असत. थोडाही उशीर झालेला राजाला खपत नसे. एक दिवस त्याला राजाकडे जायला चागले साडे–सात वाजले. राजा जाम भडकला व त्याला उशीराचे कारण विचारू लागला. 'मला येताना रस्त्यात तुमच्याच एका पोलिसाने अडवले व माझ्याकडून फुकट गोटा करून घेतला. त्याला मी काय करू ?'

'ओळखशील त्या पोलिसाला ? साल्याला फाशीच देतो बघ व जर ओळखले नाहीस तर तुला फाशी ! राजा अजून रागातच होता.

मग राजा व तो न्हावी पोलिसाची कवायत चालली होती तेथे गेले. आता न्हाव्याला प्रश्न पडला. सकाळचा पोलीस शोधून काढणे त्याला वाटले होते तेवढे सोपे नव्हते. सगळे मणिपुरी दिसायला सारखे व सगळ्या पोलिसानी सारखा गणवेश घातला होता. 'ओळख तावडतोब!' राजा गरजला. प्रसंग मोठा बाका होता; पण न्हावी मोठा डोक्याचा. तो राजाला म्हणाला,

'सगळ्यांना टोप्या काढायला सांगा महाराज !'

'त्याने काय होणार ?' राजाने परत गरजत विचारले. चागलाच रागात होता तो.

'कृपा करून सांगा तर खरे.' सगळ्या पोलिसानी टोप्या काढताच ज्याचे डोके सगळ्यात जास्त चकाकत होते त्याच्याकडे बोट करून तो म्हणाला, 'हाच तो पोलीस महाराज!' पुढे त्या पोलिसाला शिक्षा वगैरे झाली वगैरे वगैरे. अर्थात हे सगळे तो न्हावी सांगताना जेवढी मजा आली होती त्याच्या पावपटही आता आली नाही आहे.

असाच एका रविवारी तो श्यामच्या डोक्याचे मालिश करता करता म्हणाला, "साहेब, लोहियांसारखे एका दिवसात प्रश्न सोडवणारे पुढारी जोपर्यंत देशाचे पंतप्रधान होत नाहीत तोपर्यंत देशाचे काही खरे नाही बघा !" लोहियांचे सगळ्या जातीचे भक्त होते हे श्यामला माहीत होते; पण न्हावी

जातीचा व तोही मणिपूरसारख्या देशातल्या कानाकोपऱ्यात असलेल्या गावात असावा, ह्याचे श्यामला खूप कौतुक वाटले.

लोहियासाहेब कसल्या तरी सत्याग्रहाच्या प्रकरणात त्या जेलमध्ये कैदी म्हणून होते. त्यांचे केस कापत असता लोहियानी त्याला पगार किती मिळतो वगैरे चौकशी केली. त्याने काही तरी ३०–३२ रुपये मिळतात म्हणून सांगितले. 'इतका कमी? नियमाप्रमाणे जवळजवळ ९० रुपये मिळायला पाहिजेत!' लोहियासाहेब हिन्दुस्थानातल्या वेगवेगळ्या जेलमध्ये राहून आले असल्यामुळे त्याना सर्व नियमाची माहिती होती. लोहियानी एक अर्ज लिहून दिला व काय आश्चर्य! अगदी दुसऱ्या दिवसापासून त्या न्हाव्याला ९३ रुपये मिळू लागले! असा एका दिवसात कामे करून देणारा पंतप्रधान देशाला मिळायला हवा की नको? त्या न्हाव्याने विचारले. आता श्यामचे मालिश झाले असल्यामुळे त्याला मान हलवून हो म्हणणे शक्य झाले.

तेव्हा आता ओमानबद्दल काही खरे कळून घ्यावयाचे असेल तर येथल्या न्हावी समाजाच्या प्रतिनिधीशी भेट घेणे अवश्य आहे असे श्यामला वाटू लागले. कारण बाकी कोणत्याही व्यावसायिकाशी, न्हाव्याशी येतो तेवढा जवळचा संबंध आपला येत नाही, अगदी शारीरिक संबंध म्हणा ना!

दुकानाचे नाव अरबी भाषेत असल्यामुळे ते कसले आहे हे त्याला वाचता आले नाही तरी आतल्या रागरंगावरून ते केशकर्तनालय आहे हे श्यामने ओळखले व तो आत गेला. वातावरण अगदी ओळखीचे होते. केस कापणारे काळेसावळे होते. तसे केस कापून घेणारे पण तितकेच काळे-सावळे होते. गर्दीची वेळ असल्यामुळे श्यामला थोडे थांबायला लागणार होते काही हरकत नाही. तोपर्यंत येथली काही मासिके चाळून ओमानी लोकांच्या साहित्यिक जीवनाचा परिचय करून घ्यावा, ह्या विचाराने मधल्या टेबलावरील मासिके श्याम बघू लागला. बघतो तो सगळे आपले Film fare, Femina, Star Dust वगैरेचे जुने व नवे अंक होते एकच अरेबी मासिक दिसले; पण तेही इजिप्तचे होते. कारण त्यात जागोजागी सादतचे फोटो दिले होते. मग मौसमी चतर्जीचे संजीवकुमारशी कसे मेतकूट जमले आहे ह्याची मनोवेधक माहिती वाचून त्याने आपली पाळी येईपर्यंतचा वेळ घालवला.

त्याची बारी आली व तो मोकळ्या झालेल्या खुर्चीवर जाऊन बसला. ह्या न्हाव्याने श्यामच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. श्यामचा चेहरा मोठा मजेशीर आहे. हिंदी लोकांना तो हिंदी वाटतो, पाकिस्तान्यांना पाकिस्तानी वाटतो, सिलोनी लोकांना सिलोनी वाटतो व इजिप्तच्या लोकांना इजिप्शियन वाटतो.

त्या न्हाव्याने केस कापायला व बोलायला एकदमच सुरुवात केली. श्याम हिंदुस्थानचा आहे, हे कळल्यावर त्याने हिंदुस्थानचे म्हणजे कुठले? मग मुंबईचे आहे कळल्यावर मुंबईच्या कुठल्या भागातले! एवढे सगळे प्रश्न विचारल्यावर श्यामच्या मनात प्रश्न आला की, हा माणूस मराठी तर नसावा? तेवढ्यात त्याने श्यामचे नाव विचारले व ते कळल्यावर चक्क मराठीत म्हणाला, 'आम्ही पन मराठीच की!' तो केवळ मराठीच नव्हता तर दादरच्या कोहिनूर सिनेमाशेजारी त्याचे दुकान होते. त्याला येथे येऊन सहा महिनेच झाले असले तरी त्याचा मोठा भाऊ आपल्या बायका-मुलांसह गेले सात–आठ वर्षे येथे रहात होता.

'काय करतात तुमचे मोठे बधू? त्याचे येथे दुकान आहे की काय?' श्यामने काही मध हाताशी लागतो आहे का हे पहाण्याच्या हेतूने विचारले.

'दुकान वगैरे कसले? फार मोठा माणूस आहे हो! येथल्या सुलतानाचा खास माणूस आहे. सुलतानाची दाढी त्याला दररोज कातरावयाची असते.' धाकटा बंधू मोठ्या अभिमानाने म्हणाला, 'त्याला सुलतान–वाड्याशेजारी रहायला चांगली जागा दिली आहे.' परत अभिमान!

कात्रीने जशी एखाद्याची शेंडी वा मिशी चटकन कापून टाकावी तशी श्यामची ओमानवरच्या पुस्तकाची कल्पना त्या न्हावी-बंधूने कात्रीशिवायच कापून टाकली होती. केस कापण्याचे २५ रुपये झाले होते. केस कापायला पंचवीस रुपये? श्यामच्या मनात आले, बहुधा येथले न्हावी केस व खिसा कापायचे पैसे एकदम व एकत्रच घेत असावेत!

¤

आता मस्कतला येऊन जवळजवळ पंधरा दिवस होत आले होते; पण पुस्तकरूपी पिशवीत टाकायला कल्पनारूपी मासे गळाला लागत नव्हते. पुस्तक कसे होणार? जेमतेम एखादे प्रकरण होईल व तेसुद्धा परदेशाचे असे न वाटणारे, भारताच्याच कोठल्या तरी भागाबद्दलचे वाटणारे. आता काय करावे असा संभ्रम त्याला पडला. पांडव जसे अडले–नडले वा संभ्रम निर्माण झाला की, कृष्णाकडे धाव घेत असत तद्वतच नवरा कुठे अडला वा त्याच्या मनात काही संभ्रम निर्माण झाला की, तो बायकोकडे धाव घेतो. बायकोसुद्धा कृष्णाप्रमाणे अठरा अध्यायाचे चऱ्हाट न लावता एका अध्यायातच नव्हे, तर एका ओवीतच नवऱ्याचा संभ्रम दूर करते.

श्यामने सर्व माहितीचे व सर्व परिस्थिती वर्णन करणारे पत्र राधाला लिहिले व उत्तराची वाट पहात बसला राधाचे उत्तर आले, 'काही हरकत नाही. पुस्तक नाही तर नाही, एखादे प्रकरण तर होईल ना? परदेशाचे वर्णन वाटले नाही तरी हरकत नाही, हिंदुस्थानातल्या कोणत्या तरी भागाचे वाटेल ना? अनंत काणेकर व दीनानाथ दलालानी काही वर्षांपूर्वी भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशाचे वर्णन करणारे अतिशय छान पुस्तक लिहिले होते. त्याचे नाव आहे 'आमची माती, आमचे आकाश.' त्या पुस्तकाची परत आवृत्ती निघेल त्या वेळी त्याला हे प्रकरण जोडून टाकू, म्हणजे झाले!'

**समाप्त**

---


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
**मूल्य : रुपये पंधरा**


---

## मुस्लिमांतील जातिभेद : पृष्ठ ४ वरून

११. श्री. मुजफ्फर हुसेन, मुबई (म. टा. १९।९।८१) यानी सीरियातील मुसलमानाच्या केलेल्या कत्तलीचे केलेले वर्णन अतिभीषण आहे. सीरियामध्ये ७० टक्के जनता सुन्नी पंथाची आहे आणि केवळ १५ टक्के अलवी पंथाची आहे अन्य खारिणी आणि इतर पंथाचे १४ टक्के असलेल्या अलवी पथाच्या लोकाचे सरकारमध्ये वर्चस्व असून ते सुन्नी मुसलमानाचे वाटेल तसे शोषण करतात. सीरियातील हमस नगरातील कत्तल तर माणुसकीला काळिमाच लावणारी ठरावी ! या नगरात सुन्नी मुसलमांची एक परिषद आयोजित केली होती. बहुसंख्याक सुन्नींना शासकीय सेवेत प्रधान्य द्या, अल्पसंख्याकाची दादागिरी नष्ट करा आदी त्यांच्या साध्या मागण्या होत्या. अल्पसख्य आणि बहुसख्य, दोघेही मुसलमानच; पण सुन्नी परिषदेची कुणकुण लागताच अलवी सेना हमसकडे रवाना झाली आणि या सैन्याने तेथे पोहोचताच कत्तलीला प्रारंभ केला ! घराघरात घुसून बायका-मुलांना बेदम मारहाण केली, शहाराला वेढा घालून कित्येक तास अत्याचाराचा नंगा नाच चालू होता, तरुण बालवृद्धाची प्रेते फरफटत नेली, त्या नराधमांनी स्त्रियांवर अत्याचार - बलात्कार करून त्याची प्रेते इतर प्रेतांच्या ढिगाऱ्यात फेकून दिली. पळून जाणाऱ्या सुन्नींना चौकात फटके मारून मग गोळ्या घालण्यात आल्या ! गोळयांच्या आवाजात माणसांचे आवाज दबले गेले. काही तासांतच ते मैदान प्रेतानी खचाखच भरले गेले. किमान ७०० तरी सुन्नी त्या हत्याकांडात मारले गेले ! ही घटना एप्रिल १९८१ मधील आहे.

१२. आता सागलीचे श्री. शेषाप्पा बाळा बोळाज काय म्हणतात ते पाहू (तरुण भारत, मंगळवार २२।९।८१). इस्लाम धर्मात वर्ण आणि जातीचा उगम झाला आहे. कोणी वंशभेद तर कोणी वर्णभेद मानतात. मोमीन, खाटीक, तांबोळी, शिकलगार, मदारी, गारूडी, कसाब, मेहतर, भंगी, जानकार, पेंढारी, सारवान, पायरवट, दरवेशी पखाली, मुल्लामुजावर, पिंजारी, नदाफ, फकीर, पटवेगार, कलाल किती तरी जाती–जमाती मुसलमानात आहेत नि त्याच्यांत श्रेष्ठ–कनिष्ठता, उच्च-नीचता मानली जाते. त्याच्यात बेटीव्यवहार होत नाही. ह्या जाती खोजा, वोहरा, आगाखानी, कादियापंथी यांच्यापासून दूर आहेत. त्यांची प्रार्थनामंदिरे वेगळी, दफनभूमी वेगळी अशी स्थिती आहे.

'मुसलमानी धर्म समतेचा पुरस्कर्ता आहे' या वाक्याचा स्वातंत्र्यवीरानी अतिशय परखड, कठोर शब्दात समाचार घेतलेला आहे. तो मुळातूनच वाचावा (समग्र सावरकर वाङ्मय ३.५६७). या लेखात स्वातंत्र्यवीराची उत्तुग प्रतिभा, प्रगाढ अध्ययन, प्रदीर्घ चिंतन हेही दिसून येईलच. स्वातंत्र्यवीराच्या लेखनाचा थोडक्यात साराश असा की–

जे मुसलमान होऊन कुराणातील प्रत्येक वाक्य, मग ते बुद्धीच्या वा तर्काच्या कसोटीस कितीही हिणकस ठरो, ईश्वर-वाक्यासमान अनुल्लंघ्य नि सत्य मानणार नाहीत ती कोटयनुकोटी माणसे नरकातच पडणार–ते काफर. ह्या मूळ तत्त्वातील विषमता जितकी कठोर आहे त्याहूनही मुसलमानी राजवटीच्या अनुशासनातील, त्यांच्या स्मृतिनिबंधग्रंथातील विषमता शतपट क्रूरतर आहे. त्यांच्या अनेक मौलवीनी नि बादशहानी काफरास मृत्युदंडाच्या धमकीनेही मुस्लिम धर्मात आणण्यास हरकत नाही, असा धर्मदंडक घालून, जे बाटले नाहीत त्यांच्या कत्तली उडविल्या. मौलवी महंमदअली, शौकतअली यांसारखे अगदी 'पीअर्स सोप'ने धुतलेले मुस्लिम–प्रचारकही धडधडीत म्हणतात, गांधी कितीही सत्शील असले तरीही तो जोवर काफर आहे तोवर नीचातील नीच मुस्लिमही मला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठच वाटणार ! अधिक 'पाक' (शुद्ध) वाटणार !

मनुष्यजातीत मुस्लिम नि काफर असे दोन चिरंतन भेद पाडणारी ही विषमताच तेवढी मुस्लिम धर्मशास्त्रात बोकाळलेली आहे असे नसून मुसलमानातही समता वा सहिष्णुता नादत नाही. तशी समता धर्मबाह्य आहे. उदा. पैगंबर महम्मदसाहेब ज्या कुरेश जातीत जन्मले ती जात बहुतेक मुसलमानी पंथाच्या नि आचार्यांच्या मते जन्मत च शुद्ध वा श्रेष्ठ वा विशेष माननीय मानली जात आहे. मुसलमानांचा खलिफा हा या जातीतला असावा लागे, तर शिया पंथीयांच्या मते अल्लीसाहेबाचा हा जन्मजात उच्चवर्णीय खलिफा त्याच पथाचा हवा. या वादापायीच करबेलास मुसलमानानी मुसलमानांचीच भयंकर कत्तल केली ! महंमदाचे प्रत्यक्ष नातू महंमदाच्या अनुयायांनी हाल हाल करून ठार मारले !

आणि गुलामगिरी ? मनुष्याला निव्वळ पशूच समजणारी गुलामगिरी ही कुराणाप्रमाणे धर्मबाह्य नाही. मोठमोठया लढायात हजारो पाडाव केलेल्या शत्रूंना मुसलमानानी, स्त्री-पुरुष–बाल-बालिकांनासुद्धा गुलाम करून, आपण बाजारात वांगी विकतो तसे विकलेले आहे ! स्वत. महंमदांचे अनुयायी गुलाम पाळीत असत. गुलाम म्हणजे एक पशू. त्यास जीवनच नसे. मनुष्याची माणुसकीच हिरावून घेणारी भयकर प्रथा ज्या मुसलमानी धर्मात वैध आहे नि लाखो मुल्ला-मौलवी, खलिफा, बादशहा, अमीर-उमरावानी आचरलेली आहे त्या मुसलमानी धर्मात समतेचे राज्य आहे असे म्हणणे उलटया काळजाचे नव्हे काय ? असो. पठाणी मुसलमानात अमकी जात उच्च नि अमकी नीच, हा भेद अतिशय तीव्र आहे.

मुसलमानात अस्पृश्यतासुद्धा रूढ आहे. बंगालमध्ये स्पृश्य मुसलमान नि अस्पृश्य मुसलमान हा भेद इतक्या कट्टरपणे मानला जातो की, बंगालमध्ये मुसलमानाना मिळालेल्या नोकऱ्या स्पृश्य मुसलमानच लाटतात. यास्तव अस्पृश्य मुसलमानांसाठी राखीव जागाची व्यवस्था व्हावी, अशी विनंती तिथे करण्यात आली होती.

मुसलमानाच्या मशिदीसुद्धा अनेक स्थळी निरनिराळया असतात. एका पंथाच्या मशिदीत दुसऱ्या पथाच्या लोकांना मज्जाव असतो.

थोडक्यात, ज्या मुसलमानी धर्मात एकमेकाची प्रार्थनामंदिरेसुद्धा एक होऊ शकत नाहीत, त्यांनी 'आमच्यात सर्वत्र समतेचे राज्य आहे, माणसामाणसात विषमता आम्ही मानीत नाही, जातिभेद नाही, मुसलमान तेवढा एकमति, एकपंथ, एकजाति' म्हणून शपथेवर सागत फिरावे, ही शुद्ध थापेबाजी नाही काय ? □

फिनिक्स निवड

## Music for the Chameleons

('फिनिक्स निवड'ची सिक्वेल)
New writing By Truman Capote
(New American Library,
Pages 265, $ 2.95.)

'सिक्वेल' म्हणजे 'फ्लॉप!' 'पॉपिलॉन' ची सिक्वेल 'बॅन्को' बघा! 'गॉडफादर सेकन्ड' बघा! 'ओमेन'ची सिक्वेल 'डॅमियन' बघा! अशी अनेक उदाहरणे देता येतील; परतु ही एक लेखाची सिक्वेल आहे. कॅपोटच्या पुस्तकाची नव्हे! याच पुस्तकावर मी 'माणूस' च्या २० जून १९८१ च्या अकात लिहिले होते. काही वेळा इंग्रजी पुस्तक बाजारात येण्याआधीच त्या पुस्तकाची किंवा लेखकाची माहिती गोळा केलेली असते. कारण माहिती गोळा केली की, इंग्रजी पुस्तके विकत घेणे सोपे जाते. पुढचा टप्पा म्हणजे आपल्याला हवे ते पुस्तक बाजारात शोधत बसणे. कोणत्याही पुस्तकासाठी अमक्या फोनवर संपर्क साधा अशी जाहिरात मराठी पुस्तकविक्रेता देऊ शकतो; परंतु इंग्रजी पुस्तकासाठी सर्वच पुस्तके 'अंडर वन रूफ' विकत मिळणारे पुस्तकाचे दुकान इथे काय किंवा मुबईमध्ये काय मी तरी अजून पाहिलेले नाही. थाबा, थाबा-थोडं थावा. डी. एन. रोडवर व्ही. टी. च्या जवळ एक 'अंडर वन रूफ' नाही; पण 'अडर वन स्टेअरकेस' एक छोटंसं दुकान आहे. एक्सलसिअर बुक स्टॉल! या जिन्याच्या आडोशाला असलेल्या छोटयाशा दुकानात मला अनेक विषयांवर पुस्तके मिळाली तेवढी पुण्याच्या किंवा मुबईच्या अनेक भव्य दुकानातसुद्धा मिळाली नाहीत! पुण्यातील काही अतिभव्य दुकानात फ्लोअर व सीलिंगकडे न बघताच पुस्तके विकत घ्यावी लागतात. आता हे शक्य तरी आहे का? 'हार्ड थिंकिंग' हा जो प्रकार आहे तो फ्लोअर, सीलिंग किंवा रस्त्याकडे बघूनच होत असतो! जीन बोर्ग व मेकॅन्रोची मॅच पाहिली आपण? किती खाली बघून ते लायनी वर येत होते? का? लायनीजवळ कोणते तत्त्वज्ञ एवढया गहन समस्यानी नतमस्तक झाले होते? बर्ट्रांड रसेल. सार्त्र, किर्केगार्ड थोरो, नित्शे वगैरेपेक्षाही ते हार्ड थिंकिंग करत असतील असे खाली बघून चालत होते. हा कित्येक लाख डॉलर्सचा प्रश्न होता! मोठमोठया देशाचे अध्यक्ष, जे नेहमी आपल्या खाद्यावर प्रचंड ओझं घेऊन वावरत असतात, तेसुद्धा एवढं खाली बघून चालत नाहीत! (मग ते हार्ड-थिंकिंग करीतच नाहीत की काय?)

या पुस्तकाविषयी दुसऱ्यादा लिहिण्याचे कारण असे की, या पुस्तकातील 'Hand-carved Coffins' नावाची जी nonfiction कादंबरी आहे ती वाचून मला पद्य लिखाणाचा एक अगदी नवा अविष्कार सापडला. यात थोडासा काफ्काइस्क व बरासचा हिचकॉकी 'टच' आहे तरी पण त्या दोहोचे ते अनुकरण नाही. या छोटया कादबरीत आपण कल्पना (fiction) व वास्तव (non-fiction) या दोन्ही टोकामध्ये झोटयाप्रमाणे ये-जा करायला लागतो. कधी कादंबऱ्याप्रमाणे सवाद तर कधी नाटकाप्रमाणे कसात स्पष्टीकरण आणि कधी सरळधोपट निवेदन; पण गमत म्हणजे अशी की, जेव्हा आपण पहिल्यांदाच विमानातून प्रवास करतो तेव्हा विहगमदृश्ये बघतानाच एवढ रगून जातो की, आपल्याला भीती वाटायची आठवतच नाही. तसेच हा प्रकार कादबरी, नाटक का निवेदन आहे यावर निर्णय घेण्याचे आपण पार विसरून जातो.

मराठीतील सर्व साहित्यिकानी लिखाणाचे असे वेगवेगळे फॉर्म्स वाचावे असे मला वाटते. 'मी इग्रजी साहित्य वाचत नाही. त्याने माझ्या साहित्यात उच्छिष्टतेचा प्रवेश होईल.' असेही बरेच वेळा ऐकले आहे. ज्याचे हसा वाडकरसारखे भिंगातून निघणाऱ्या उन्हाप्रमाणे केंद्रित झालेले जीवन गेले असेल त्यांच्यासाठी हे म्हणणे बरोबर आहे; पण जे नेहमीच अनेक विषयावर लिहीत असतात त्यानी उच्छिष्टपणाच्या ढालीखाली हस्तीदंती मनोऱ्यात राहून लिखाण करणे ठीक होणार नाही. उच्छिष्टपणाच्या व्यासपीठावरून नवे विचार, साहित्याच्या नव्या प्रकाराकडे दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही.

या नॉन-फिक्शन कादंबरीतील घटना अमेरिकेत घडलेल्या आहेत. अशा पद्धतीने कुणी खून करू शकेल यावर आपला विश्वास बसत नाही! खून करण्याचा हा एक प्रकार बघा. अमेरिकेतील रॅटल्स्नेक्स् किती विषारी असतो हे बहुतेकाना माहिती आहेच. याला पीट व्हायपर असेसुद्धा सबोधले जाते. रॅटल्स्नेकच्या शेपटीच्या शेवटी कडयाकडयांच्या डिझाइनसारखे वर आलेले काही तरी असते. (रिंगा असलेला हॉस पाइप असतो ना, तसे) यामुळे शेपटी हालली की, खडखडल्यासारखा आवाज येतो. यावरून त्याचे नाव रॅटलस्नेक पडले. असे सात-आठ जिवत सर्प या खुन्याने गोळा केले व त्याना ॲम्फीटॅइन्सची इंजेक्शने देऊन ज्या मध्यमवयीन जोडप्याला मारायचे होते त्याचे गाडीत ठेवून दिले. ते उन्हाळ्याचे दिवस होते. जोडप गाडीजवळ आल्यावर त्याना काचा वर केलेल्या आढळल्या. दोघानी पुढील बाजूच्या वेगवेगळ्या दारातून गाडीत प्रवेश करण्यासाठी दार उघडले. उन्हाळ्यामुळे त्रस्त झालेले व मादक औषधामुळे बेहोश झालेले सर्व सर्प त्या जोडप्यावर तुटून पडले. तोडावर, हातावर, गळयावर अनेक ठिकाणी त्या भुजगानी त्याना दश केले. त्याचे चेहरे मोपळयासारखे फुगले. विषामुळे त्या दोघाचा रग अगदी हिरवा झाला! त्याना मृत्यू अगदी तात्काळ घडून गेला एवढेच आश्वासन नातेवाइकाना मिळाले!

पण या पुस्तकात आणखीन एका खुनाविषयी जर तुम्ही वाचाल तर या खुन्याने खून करण्यात कसकसा काव्यात्मक हिडिसपणा साधला आहे याचे तुम्हाला प्रत्यंतर येईल.

कल्पना करा. तारेने शिरच्छेद! ऐकलंय कधी? कल्पना तरी कधी केलीय? एका माणसाला एक विचित्र छद होता. (पाश्चात्य देशात म्हणे विचित्र लोक जोपासले जातात. सर्वच लोक स्टॅंडर्डाईज्ड झाले तर आयुष्यातील मसाल्याचे काय? भारतात मात्र विचित्रपणा lynch केला जातो. ओरिजिनॅलिटी फारशी खपवली जात नाही.) अगदी उघडी जीप घेऊन हिंडायचा. विन्डशिल्डसुद्धा त्याने काढून टाकली होती. आपल्या खुन्याने गणिताचा व त्या माणसाच्या सवयीचा अभ्यास करून रस्त्यामधील समोरासमोरच्या दोन खांबांना अगदी पातळ व

टणक तार बांधली. त्यानं माप इतकं अचूक घेतलं होतं की, सावज जीपमध्ये फुल स्पीडने आले व अगदी गिलोटिनप्रमाणे धडावेगळं शीर झालं ! माणसाना काय किंवा पपेटस्‌ना काय अशी बारीक व पातळ तार व दोरे दिसतात का ?

आपला खुनी भलताच शिस्तबद्ध ! खून करण्याआधी तो पोस्टाने एक शवपेटी पाठवायचा. त्या शवपेटीत ज्याचा खून होणार त्याचा फोटो असे. वरील खूनप्रकरणात त्या माणसाला शवपेटी पाठवण्यात आली होती. त्यात त्याचाच जीप चालवत असतानाचा फोटो होता.

मी याआधी लिहिलेच होते की श्री. कॅपोटेचे 'In Cold Blood' हे पुस्तक म्हणजे अमेरिकेतील एक क्लासिक क्राइम स्टडी आहे. असे गुन्हे वाचून आपलं रक्तच गोठून जातं या पुस्तकातील 'हॅंडकार्व्हड् कॉफिन्स' हा प्रकार वाचताना सर्पाचे डोळे म्हणे माणसाला मंत्रमुग्ध करून टाकतात, तसेच आपण अगदी हिप्नोटाईज् होऊन जातो.

— जे. एन्. पोंडा

---

रंगभूमी

# मॅडम

## सेक्सच्या मुखवट्यामागे पुराण्या भट्टीचाच चेहरा

'नाट्यसुविधा' या संस्थेतर्फे प्रा. टी के. जाधव यांच्या 'मुखवटा' या कादंबरीवर आधारित 'मॅडम' हे नाटक नुकतेच दुकानात आले. कादंबरीचे नाट्यरूपांतर श्रीनिवास भणगे यांनी केले आहे.

श्रीमती नलिनी पाटणकर (आशू) ही एक राजकीय वर्तुळातील बडी आसामी, एका शहराची महापौर. (नाटकाच्या जाहिरातीतच 'बाप्पा, ही सत्यकथा मुळीच नाही.' असे बजावून सांगितल्यामुळे नायिकेच्या नावातील 'लिनीपाट' हे साधर्म्य योगायोगाचाच भाग असल्याचे मी मानून घेतले.) या राजकीय महत्त्वाच्या मुखवट्यामागे एक शारीरिक सुखासाठी वखवखलेली आणि त्यायोगे पुरुषजातीवर सूड उगवू इच्छिणारी स्त्री लपलेली होती. (या माडलेल्या दुकानातील ही मोठी शोरूम.) मग अर्थातच या सगळ्या वखवखीला एक सहानुभूतीपूर्ण तर्कटयुक्त बैठक देण्यासाठी नलिनीचे अत्याचारांनी भरलेले पूर्वायुष्य. या सगळ्याच्या जोडीला काही चिल्लर शब्दच्छलांच्या जोडीने राजकीय टीकाटिप्पणीचा केलेला प्रयत्न म्हणजे या दुकानाची मोडतोड झालेले अडगळीचे गोडाऊन.

केवळ मोठ्या काठाच्या खादी सिल्कच्या साड्या वापरण्याने किंवा येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्याशी नाटकी सहानुभूतीने बोलण्याने किंवा फक्त उच्च वर्तुळात वावरणाऱ्या लोकाशी शरीरसंबंध ठेवण्यानेच एखाद्या स्त्रीचे राजकीय व्यक्तिमत्त्व उभे राहात नाही. अर्थात व्यक्तिरेखाटनाचा हा ठिसूळपणा या प्रमुख व्यक्तिरेखेप्रमाणेच अन्य महत्त्वाच्या व्यक्तिरेखाबाबतही आहे. विनाकारण मूर्ख वकबक करणारा सरपंच धांडगे पाटील (रमेश पवार) अजागळ आणि गरीब डी एस. पी. काळेसाहेब, 'प्रकाशन' म्हणताना पंधरा वेळा अडखळणारा पण 'उद्‌घाटन' शब्द मात्र धाडकन म्हणणारा रहीमचाचा ही काही उदाहरणे. या सगळ्या पार्श्वभूमीवर पत्रकार, सेक्रेटरी अशोक आशा दुय्यम व्यक्तिरेखाच त्या मानाने बऱ्या उतरल्या आहेत.

नाटकाचे दिग्दर्शन आणि नेपथ्य भालचंद्र पानसे यांचे आहे. माडलेल्या दुकानाची शोरूम गर्दी खेचून घेईल, अशा रीतीने त्यानी सजवली आहेच. स्टेजवर एका पार्टीशनमागे मॅडमने साड्या आणि अन्य कपडे बदलणे मॅडमच्या गाऊनची झीप लावताना अशोकने त्यांना मिठी मारणे इत्यादी अनावश्यक प्रकार योग्य त्या गोष्टीना योग्य तितका उठाव देत दाखवण्याचे कौशल्य त्यानी दाखवले आहेच. या गोष्टीकडे अवाजवी लक्ष द्यावे लागल्यामुळे अर्थातच अन्य चिल्लर गोष्टीकडे त्याचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे रहीमचाचा सतत पायाला टाचण्या टोचत असल्याप्रमाणे नाचत राहतात, मोहिनी (उज्ज्वला केणी) आपण अजूनही पाळण्यातील दूधपिते बाळ असल्याप्रमाणे नकोइतका लाडिकपणा करीत राहते. नलिनीच्या वासनेचे प्रतीक, म्हणून गणेशोत्सवातील रंगीबेरंगी चक्र फिरविणे हीही पानश्यांच्या दिग्दर्शनाची किमया असावी.

कलाकारांपैकी आधी उल्लेख केलेल्या पत्रकार आणि सेक्रेटरी अशोक यांची कामे वगळता बाकी लोक म्हणजे असून अडगळ नसून घोटाळा असा प्रकार होता. विशेषतः टिपेच्या आवाजात बोलणारे, 'अग माझ्या जोहराई, अग माझ्या संतोषीमाता' असा आरडाओरडा करणारे आणि धोतर फेडणे, घोषणा करणे इत्यादी फुटकळ बालिश विनोद करणारे रमेश पवार सर्वाधिक त्रास देतात. अर्थात प्रेक्षकाला छळण्याच्या आणि त्रास देण्याच्या या स्पर्धेत सगळ्याच कलाकाराचा सारखाच सहभाग आहे, त्यामुळे निवडणाऱ्याने काळे–गोरे तरी काय निवडायचे ?

एकूणच या नाटकाचा विचार करता थोडासा कपड्यांआड दडलेला आणि थोडासा कपड्याबाहेर डोकावणारा सेक्स आणि या मुखवट्यामागे लपवलेली तीच हासू अधिक आसूची जुनीपुराणी भट्टी या नाटकात मांडली आहे. बाळ कोल्हटकरांच्या काळात ही भट्टी दादा ताई सतत पेटती ठेवत; तर बदलल्या काळाप्रमाणे आता ही भट्टी पेटती ठेवणारे लोकही बदलले. हीच जुनाट भट्टी पेटवायची म्हटल्यानंतर मग त्यात तिच्या गरजेनुसार राजकीय पुढारी येतात, कॉलेजातील प्रोफेसर येतात, नोकरी नसल्याने आगगाडीखाली जीव देणारा विद्यार्थी येतो, सर्वधर्मसमभाव पाळून नलिनीला वाढवणारा रहीमचाचा येतो आणि या सगळ्या भाऊगर्दीत बिचारे खरेखुरे नाटक मात्र हरवून जाते.

—सदानंद बोरसे

**पुणे वार्ता : पृष्ठ ३ वरून**

मंचकावर पहुडला असता राजाने एक फळ कापलं. त्यातून एक साप बाहेर पडला. त्याने राजाला दंश केला. राजा गतप्राण झाला !! ¤

# हिंदू तितुका एक एक !

गुरुवार, तारीख बारा नोव्हेंबर. पुण्यातल्या शनिवारवाड्याचा सबंध परिसर पुणेकरांनी फुलून गेला होता. नव्या पुलापासून ते 'सकाळ' कचेरीपर्यंत आणि मंगळवार पेठेपासून कसवा पोलीसचौकीपर्यंतचे सर्व रस्ते वाहतुकीला बद करण्यात आले होते. शनिवारवाड्यासमोरचं पटांगण श्रोत्यानी भरून गेलं होतं जागोजाग भगवे ध्वज उंचावलेले होते. पटांगणाला भेळ–पुरीच्या गाड्या आणि पोलिसाचं कडं पडलं होत. शनिवारवाड्यावर एवढी प्रचंड जाहीर सभा बऱ्याच महिन्यानंतर होत होती. कारण कोणत्याही अधिकृत राजकीय पक्षाने ती आयोजित केली नव्हती; तर पुण्यातल्या पतितपावन या संघटनेने आज या ठिकाणी 'विराट हिंदू मेळावा' आयोजित केला होता. मेळाव्याचं प्रयोजन होतं देशात काही महिन्यांपूर्वी झालेल्या धर्मांतराच्या काही घटना !

सध्या पुण्यात सर्वत्र गाजत असलेले श्री. बाबासाहेब देशमुख याच्या पोवाडे–गायनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. नंतर पतितपावन संघटनेचे नेते प्रदीप रावत यांनी आपल्या प्रास्ताविकात हिंदू समाज हा देशाचा कणा असल्याने हिंदूच्या ऐक्यावर देशाचे अखंडत्व अवलंबून आहे. म्हणून हिंदूचे भक्कम ऐक्य झाले पाहिजे, असा विचार आग्रहाने माडला. श्री. रावत यांच्यानंतर पुण्यातल्या गुरुद्वाराचे एक मुख्य पुजारी श्री. ग्यानीजी याचंही भाषण झालं. त्यांनी आपल्या भाषणात अतिशय सुदर आवाजात दोन प्रार्थना म्हटल्या; पण खलिस्तान चळवळीबाबत मात्र चकार शब्दही काढला नाही. खरं म्हणजे हिंदु ऐक्याला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने अशा स्वरूपाच्या चळवळीचा जाहीर धिक्कार केला पाहिजे; पण ग्यानीजींनी त्यावर मौनच पाळलं. कुटुंबियासह हिंदू धर्मात प्रवेश केलेले आचार्य मित्रजीवन (आधीचे डॉ. नसिरुद्दीन कमाल.) यांचा या मेळाव्यात सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, 'ख्रिस्ती व इस्लामी धर्मांचा सखोल अभ्यास केल्यावर हे धर्म म्हणजे मूळच्या सनातन धर्माचे उपासनापंथ आहेत. जगा, जगवा आणि जगू द्या ही भारतीय परंपरा फक्त हिंदू धर्मानेच जपली आहे !'

गेली सुमारे पंचवीस वर्षं 'शुद्धीकरण–चळवळ' एका कठोर निष्ठेनं चालविणारे ब्रह्मचारी विश्वनाथजी यांचं भाषण सर्वांत प्रभावी झालं.

'हिंदु समाजातील दुर्बल घटकाच्या अडी–अडचणी समजावून घेऊन त्यांची प्रगती करून एकसध हिंदू समाज निर्माण करण्याची आवश्यकता जोरदारपणे व्यक्त करून विश्वनाथजी म्हणाले, 'आत्तापर्यंत शेकडो वर्षांत हिंदू समाजातील हरिजन–गिरिजनांपुढे अनेक प्रलोभने दाखविण्यात आली. तरी त्यांनी हिंदू धर्म सोडला नाही याबद्दल आपण सर्वांनी त्यांचं कृतज्ञ राहायला हवं ! यापुढील काळात समाजातील जातिभेद, उच्च–नीचता, अस्पृश्यता नष्ट करून हिंदूचं भक्कम ऐक्य साधलं पाहिजे,' असंही आचार्यांनी बजावल.

शेवटी विविध प्रमुख व्यक्तीचे सत्कार झाल्यावर हा भव्य मेळावा विसर्जित झाला. ¤

शनिवारवाड्यापासून शहराच्या विविध भागाकडे जाणारे रस्ते पुन्हा ओसंडून वाहू लागले. मेळाव्याला आलेले हजारो 'हिंदू' नवं चैतन्य घेऊन घरी परतत होते.

अशा स्वरूपाचा, एवढा मोठा जाहीर मेळावा पतितपावन संघटनेतर्फे प्रथमच आयोजित करण्यात आला. या मेळाव्यामागील मुख्य प्रयोजनं दोन असावीत, असं वाटतं. १) पतितपावन संघटनेची ताकद, क्षमता अजमावून पाहाणं व २) पुणे शहरात हिंदुत्वविरोधी ज्या काही शक्ती असतील त्याना आपल्या बलाढ्यतेचं, आक्रमकतेच दर्शन घडवून जरब बसवणं. या मेळाव्यानं हे दोन्ही उद्देश जवळजवळ शंभर टक्के पूर्ण झाले; पण कोणत्याही हिंदुत्ववादी संघटनेचा खरा कस धर्मांतराच्या प्रश्नाशी प्रत्यक्ष दोन हात करतानाच लागणार आहे. पाऱ्याच्या गोळीप्रमाणे हातातून सतत निसटू पाहणाऱ्या या विषयाने गेली किमान पंचवीस वर्षं तरी हिंदु–मनाला ग्रासलं आहे. कारण सामूहिक धर्मांतराचा भारतातील पहिला मोठा प्रयोग पंचवीस वर्षांपूर्वीच झाला. नंतर अशा घटनांची कमी–जास्त प्रमाणात पुनरावृत्तीही झाली; पण सुमारे सहा महिन्यांपूर्वी मीनाक्षीपुरमला पाचशे दलित हिंदूनी मुस्लिम धर्मात प्रवेश केला आणि देशातील हिंदू–मन खडबडून जागं झालं. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी–प्रथाचं समर्थन या मनाला करायचं नव्हतं; पण तू ज्या वाटेनं जाऊ पहात आहेस ती वाट तुला याहूनही खोल दरीत घेऊन जाणारी आहे, अस आपल्या दलित बांधवाला ते ओरडून सांगत होतं.

हे धर्मांतर सामाजिक समतेच्या भुकेपोटी झालं की, केवळ प्रलोभनाना बळी पडल्यामुळं झालं, यावरही विद्वानांमध्ये वाद माजले. अर्थात कोणत्याही कारणास्तव धर्मांतर केलं तरी ते वाईटच, असं पालुपदही या वादांमध्ये सुरुवातीला आणि शेवटी जोडलं जात होतंच !

आत्मटीकेमधून माणसाची उन्नती होते, हे खरं आहे; पण गेल्या काही वर्षांत इथले विचारवंत आत्मटीकेतून आत्मउपहास, आत्मनिर्भत्सनेच्या पातळीपर्यंत खाली घसरले आहेत आणि त्यामुळेच अन्य समाजापासून त्याची नाळ तुटली आहे. हिंदुधर्मावर वाटेल तसं तोंडसुख घेणाऱ्या या विचारवताना अल्पसंख्याक धर्म–जमातीचा एकागी अनुनय करण्यात मात्र काहीही गैर वाटत नाही. हे अयोग्य आहे; पण असं होण्याचं मुख्य कारण दिसते ते हे की, या विचारवंताचे काही हितसंबंध इथल्या सत्तेच्या राजकारणामध्ये गुतलेले आहेत आणि एकदा त्या रिंगणात उतरल्यावर काय 'कामातुराणां न भयं, न लज्जा ––– ' असा प्रकार चालू आहे !

तेव्हा धर्मांतराची कुंडली नि.पक्षपातीपणाने माडायचीच झाली तर ती अशी माडावी लागेल - जगातील सर्व धर्मांची मूलतत्त्वं उच्च व उदात्त आहेत; पण या तत्वाचं प्रत्यक्ष व्यवहारातील आचरण मात्र अति-


MANOOS ( Marathi Weekly )   100 Paise   Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without preyayment of postage–No. 11 )

शय हीनपणे चालू आहे. त्यामुळे कोणत्याही धर्माचं आचरण करणं त्याज्यच मानलं पाहिजे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगामध्ये एकच धर्म टिकू शकतो, तो म्हणजे माणसाने माणसाशी आणि प्राणीमात्राशीही, माणसासारखं वागणं ! आपल्यातील ‘ आहार, निद्रा, भय, मैथुनं च ’ या चार पशुवत् गुणधर्मांवर आयुष्याचा जास्तीत जास्त काळ संयम ठेवणं व मानवतावादी मूल्याच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करणं हेच आजच्या काळात कोणत्याही माणसाचं ऐहिक व पारमार्थिक कर्तव्य ठरतं. त्यामुळं हिंदुधर्मातून मुस्लिमधर्मात जाणं, ख्रिश्चनधर्मात जाणं किंवा या धर्मांमधून पुन्हा हिंदुधर्मात येणं म्हणजे सर्कशीत झूल्यावरच्या खेळामध्ये झोके घेणाऱ्या कसरतपटूसारखं आहे. सतत कुठली तरी दाडी धरून ठेवलेली आहेच ! ही दाडी सोडणं ज्याला जमलं त्यांची सुटका होते ( ‘ मोक्ष ’ यालाच तर म्हणत नाहीत ना ? ), बाकीचे गरागरा फिरत राहतात !

पण असं करणं फार थोड्यांना जमेल. शेवटी विठ्ठलाची मूर्ती डोळ्यासमोर असल्याशिवाय त्याच्याशी संवाद साधणं बहुतेकांना अशक्यच असतं. मग अशा वेळी काय निवडावं ? कोणताही धर्म संपूर्णत: निर्दोष समाजव्यवस्था निर्माण करूच शकत नाही. आपण सतत एका दोषमय अवस्थेतून दुसऱ्या दोषमयच अवस्थेकडे जात असतो, मग अशा वेळी कोणता धर्म कमीत कमी तीव्र व जास्तीत जास्त सहृय अशी दोषमय अवस्था निर्माण करतो ? दुर्दैवाने आजच्या काळात तरी, दगडापेक्षा वीट मऊ, या न्यायानेच या द्वंद्वाचा निवाडा करावा लागत आहे. त्यामुळं दगड कुठला आणि वीट कुठली हे ज्यानं त्यानं आपापल्यापुरते ठरवायचं आहे; तसंच या द्वंद्वातून लवकरात लवकर बाहेर पडण्याचाही प्रयत्न करायचा आहे. त्यातच त्याचा स्वार्थ आणि परमार्थ, दोन्हीही दडलेलं आहे ! तोपर्यंत अशी धर्मांतरं, धर्मांतरिताची धर्मांतरं चालूच राहणार ! तरीही कोणत्याही एकाच धर्माचा छातीठोकपणानं पुरस्कार करणं मात्र अशक्य आहे ! !

–सतीश कामत

शेतकरी नेते श्री. शरद जोशी
यांचे व्यक्तिमत्त्व व विचार
सादर करणारे, तसेच त्यांच्या
व कै. माधवराव बोरस्ते,
श्री. प्रल्हाद पाटील,
श्री. माधवराव मोरे
इत्यादीच्या नेतृत्वाखाली
लढल्या गेलेल्या नासिकच्या
ऊस–शेतकरी–आंदोलनाचा
चक्षुर्वै सत्यं बृत्तान्त
कथन करणारे पुस्तक




लेखक : विजय परुळकर

सचित्र आवृत्ती । पंचरंगी मुखपृष्ठ । किंमत : रुपये छत्तीस

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.